सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ९ जानेवारी २०२६ | वर्ष - ३ रे | अंक २७३ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### महाराष्ट्रात बाळासाहेब ठाकरे एकच ब्रँड : मुख्यमंत्री

मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरे बंधूंवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. फडणवीस म्हणाले, या महाराष्ट्रामध्ये एकच ब्रँड होता, हिंदू हृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे. आता यानंतर महाराष्ट्रामध्ये कोणी ब्रँड नाही. तसेच, स्वतःला ब्रँड सांगणाऱ्यांचा बँड वाजवू, असा इशाराही त्यांनी दिला. महायुती (भाजप-शिवसेना) मजबूत असून, कोणीही स्वतःला ब्रँड मानून समोर आल्यास त्याचा बँड वाजवल्याशिवाय थांबणार नाही, असे फडणवीसांनी स्पष्ट केले.आगामी काळात शिवतीर्थावर ठाकरे गटाची, मनसे आणि राष्ट्रवादीची ऐतिहासिक सभा होणार असून, उल्हासनगरमध्ये गुंडाराज चालणार नाही, असेही फडणवीसांनी नमूद केले.

### छत्रपती संभाजीनगरात मुख्यमंत्र्यांनी ठेवलं विकासाचं व्हिजन

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती संभाजीनगरमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी टॉक शोच्या माध्यमातून जनतेशी संवाद साधला. यावेळी त्यांनी छत्रपती संभाजीनगरसाठी भविष्यातील विकासाचा प्लान सांगितला. या भागातील डीपी रोड अतिक्रमणमुक्त करणार असंही त्यांनी यावेळी सांगितलं. किर्लोस्कर, जेएसडब्ल्यूसारखे मोठे उद्योग या भागात येतील असं त्यांनी सांगितलं. दावोसमधून संभाजीनगरसाठी आणखी प्रकल्प आणू अशीही घोषणा त्यांनी यावेळी केली.

### अहिल्यादेवी यांचे नाव देऊन आम्ही थांबणार नाही- देवेंद्र फडणवीस

**अहिल्यानगर :** अहिल्यादेवी यांचे नाव देऊन आम्ही थांबणार नाही तर ज्या पद्धतीने अहिल्यादेवी यांनी त्यांची राजधानी महेश्वर केले तसेच अहिल्यानगर शहर झाले पाहिजे. आत्ताच मला एक घोटाळ्या संदर्भात निवेदन मिळाले, त्या संदर्भात मी त्यांना सोडणार नाही, ज्यांनी कंपनी स्थापून गोरगरिबाना फसवले, मी केंद्रीय गृहमंत्री यांना भेटून ललळ मार्फत चौकशी करण्याची मागणी करणार, देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

### परभणीचा पारा पुन्हा घसरला

परभणी : परभणी जिल्ह्यात पुन्हा तापमानाचा पारा घसरला असून आजचा तापमान ६ अंश सेल्सिअसवर जाऊन ठेपलय, यामुळे नागरिकांना हुडहुडी भरत असल्याने ठिकठिकाणी शेकोट्या पेटू लागल्या आहेत, शिवाय अंगाला झोम्बून जाणारे थंड गार वारे वाहत असल्याने बोचऱ्या थंडीचा अनुभव नागरिकांना येऊ लागलाय. मागील आठवडाभर तापमान वाढून ढग दाटून राहत होते, त्यामुळे थंडीचा प्रभाव कमी झाला होता,पण आता थंडी वाढल्याने नागरिकांची झोप उशिराने होऊ लागलीय.

### राज ठाकरेंचा आज ठाण्यात रोड शो

**कल्याण :** आज कल्याणमध्ये राज ठाकरे सकाळी ११ वाजता मनसेचे उमेदवारच्या कार्यालयाचे राज ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन त्यानंतर बैठका होणार आहे. सायंकाळी पाच वाजता खारीगाव टोल नाका येथून राज ठाकरे ठाण्यात प्रवेश करणार आहे. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा मतदार संघात वागळे इस्टेट येथे राज ठाकरेंचा दौरा असणार आहे. वागळे इस्टेट नौपाडा घोडबंदर अशा अनेक ठिकाणी राज ठाकरेंचा असणार रोड शो होणार आहे.

### राजकारणात कोणी कायमचा शत्रू नसतो आणि मित्रही नसतो : पवार

**पुणे :** पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये आम्ही युती करतोय. कोल्हापुरात आधी युती झाली होती. जेव्हाही चर्चा केल्यावर कुणाला तरी बरोबर घेतलं पाहिजे. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये सूर जुळले पाहिजे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस एकत्र येण्याच्या प्रश्नावर अजित पवार यांनी ही प्रतिक्रिया दिली. इतके वर्ष राष्ट्रवादी म्हणून काम केलं. पक्षाची स्थापना झाल्यापासून आम्ही एकत्र काम केलं आहे. राजकारणात कोणी कुणाचा कायमचा शत्रू नसतो आणि मित्रही नसतो असंही अजित पवार म्हणाले.

### जयंत पाटलांचा झंझावात

**सांगली :** सांगली-मिरज महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाने प्रचाराचा धडाका लावला असून, आमदार जयंत पाटील यांनी मिरजेत मॅरेथॉन सभा घेतल्या. काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडीचे उमेदवार अभिजीत हारगे आणि आम्रपाली कांबळे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत पाटलांनी विरोधकांचा समाचार घेतला.

### मतदान जनजागृतीसाठी उपक्रम

**मालेगाव :** मालेगाव महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सध्या सुरू असून विविध राजकीय पक्ष प्रचारात उतरले आहे .तर दुसरीकडे महापालिका प्रशासन मतदानाचा टक्का वाढावा मत जनजागृती व्हावी यासाठी वेगवेगळे उपक्रम राबवित आहे. यामध्ये मालेगाव शहरातील तृतीयपंथीयांना एकत्रित करून त्यांना मतदान करण्याबाबत जनजागृती करत मतदान करण्याची शपथ देण्यात आली.

# निवडून आलेले १२ नगरसेवक भाजपात

## अंबरनाथमध्ये काँग्रेसला मोठा धक्का; राजकारणात खळबळ

**मुंबई :** राज्यात २९ महापालिकांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू आहे. त्यामुळे सर्वच राजकीय पक्ष या निवडणुकीत जोर लावताना दिसत आहेत. जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणून महापालिका आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी जीव ओतून काम करण्यास सुरुवात केली आहे. त्यासाठी उलट्या सुलट्या आघाड्याही केल्या आहेत. तर काही ठिकाणी उमेदवारांची पळवापळवीही सुरू आहे. या सर्व घडामोडी घडत असतानाच अंबरनाथमध्ये मात्र काँग्रेसला (उेपसीर्शीी) मोठं खिंडार पडलं आहे. नगर परिषदेच्या निवडणुकीत नुकतेच निवडून आलेले १२ नगरसेवक आज भाजपमध्ये (इगझ) प्रवेश करत आहेत. काँग्रेससाठी हा सर्वात मोठा झटका असल्याचं मानलं जात आहे.



दर्शना पाटील, अर्चना पाटील, हर्षदा पाटील, तेजस्विनी पाटील, प्रदीप पाटील, विपुल पाटील, कबीर गायकवाड, मनीष म्हात्रे, धनलक्ष्मी जयशंकर, संजिवनी देवडे, दिनेश गायकवाड आणि किरण राठोड हे १२ नगरसेवक काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश करत आहेत. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि भाजप नेते तसेच मंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते हा पक्षप्रवेश सोहळा पार पडणार आहे. संजीव नाईक आणि दीपक म्हात्रे आदींचीही यावेळी उपस्थिती राहणार आहे.

अंबरनाथ शहरात अंबरनाथ विकास आघाडी स्थापन करण्यात आली होती. या आघाडीत भाजप, अजितदादा गट आणि काँग्रेस होती. त्यामुळे काँग्रेसची भाजपसोबत युती झाल्याची राज्यभर चर्चा सुरू होती. राष्ट्रीय पातळीवरही या चर्चेने लक्ष वेधलं होतं. त्याची काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी गंभीर दखल घेत या १२ नगरसेवकांवर कारवाई केली. त्यामुळे काँग्रेसचे अंबरनाथचे काँग्रेसचे ब्लॉक अध्यक्ष प्रदीप पाटील नाराज झाले होते. त्यानंतर बऱ्याच राजकीय घडामोडी घडल्या आणि या १२ नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. या नगरसेवकांनी भाजपमध्ये जाणं हा काँग्रेससाठी धक्का मानलं जात आहे. निवडून आलेले नगरसेवक नितीमत्ता पाळत नाहीत. पक्षादेश मानत नाहीत. स्वत:च्या मनाने कारभार करतात. अशावेळी विश्वास ठेवायचा तरी कुणावर असा सवाल या निमित्ताने विचारला जात आहे.

दरम्यान, कालच हर्षवर्धन सपकाळ यांनी या मुद्यावर प्रतिक्रिया दिली होती. भाजपसोबत आमचा कोणताही संबंध नाही. निवडणूक लढवताना त्यांच्याशी कोणताही घरोबा केलेला नाही. आमच्या नगरसेवकांनी कुणालाही पाठिंबा दिला नाही. आमचा भाजपला पाठिंबा नाही. आम्ही भाजप सोबत जाणार नाही. काँगेसच्या तालुका अध्यक्षांना याबाबतचं स्पष्टकरणं मागितलं आहे, असं सपकाळ म्हणाले होते.

# श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या वतीने कोल्हापूर संस्थानचे छत्रपती शाहू महाराजांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा



**त. भा. वृत्तसेवा.**

**कोल्हापूर. दि. ८ जानेवारी :** कोल्हापूर संस्थानाचे छत्रपती शाहू महाराज यांच्या वाढदिवसानिमित्त अक्कलकोट श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्ममेंजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या वतीने सन्मान करण्यात आला. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ पालखी पादुका परिक्रमाचे मुख्य संयोजक व विश्वस्त संतोष भोसले यांच्या हस्ते कोल्हापुर पॅलेस येथे करण्यात आला. याप्रसंगी जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांनी भ्रमणध्वनीवरून मानाचा मुजरा करुन अभीष्टचिंतन केले .

## प्रत्येकाने काय बोलावं हा ज्याचा त्याचा अधिकार : अजित पवार

**मुंबई :** ७० हजार कोटींच्या घोटाळ्यावरून झालेल्या आरोपाच्या मुद्यावरून अजित पवारांनी केलेल्या विधानानंतर ही केस अजून कोर्टात सुरू आहे, असा इशारा चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला होता. त्यावर अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. प्रत्येकाने काय बोलावं हा ज्याचा त्याचा अधिकार आहे. त्यावर मी जास्त बोलणार नाही असं ते म्हणाले. केंद्रात एनडीएसोबत आहोत, आम्ही राज्यात युती सोबत आहोत, त्यांच्यासोबत काम करत आहोत. विकास करत आहोत असंही अजित पवार यांनी नमूद केलं.

# आता छत्रपती संभाजीनगर थांबणार नाही

## मुख्यमंत्री फडणवीसांनी सांगितला मराठवाड्याच्या विकासाचा रोड मॅप

**छत्रपती संभाजीनगर :** आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या टॉक शोचं छत्रपती संभाजीनगरमध्ये आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी बोलताना त्यांनी छत्रपती संभाजीनगर आणि मराठवाड्याच्या विकासाचा रोड मॅप सांगितला. छत्रपती संभाजीनगर हे मराठवाड्यातील प्रमुख शहर मानलं जातं. परंतु वर्षानुवर्ष इथे दुष्काळ आणि रोजगाराचा वणवा आढळतो. आपण मुख्यमंत्री आहात त्यामुळे आज आपण छत्रपती संभाजीनगर आणि मराठवाड्याकडे कसे पहाता. असा प्रश्न या मुलाखतीमध्ये फडणवीस यांना विचारण्यात आला होता, या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी मराठवाड्याच्या विकासाचा रोड मॅप सांगितला.

मुळामध्ये बघा मी विदर्भातून येतो, आणि मराठवाडा व विदर्भातील मागासपणाबद्दल वर्षानुवर्ष लढणाऱ्यांपैकी आम्ही आहोत. ९९ पासून महाराष्ट्रातील विधानसभेत जेव्हा महाराष्ट्रातील मागास भागाची लढाई सुरू केली, तेव्हा फक्त विदर्भ नाही तर विदर्भासोबत मी मराठवाड्याचा विषय देखील मांडायचो. म्हणजे जे काही दु:ख आहे, ते विदर्भ आणि मराठवाड्याचं सारखंच आहे, त्यामुळे आम्ही ते दु:ख समजून घेतलं, आणि म्हणूनच मला जेव्हा पहिल्या टर्मला मुख्यमंत्री म्हणून काम करण्याची संधी मिळाली. ज्यावेळी दिल्ली- मुंबई कॉरिडॉर घोषीत झाला, त्याचं काम सुरू झालं, तेव्हा सगळ्यात जास्त वेगानं डीएमआयसीचं काम आपण महाराष्ट्रात छत्रपती संभाजीनगरात केलं, असं यावेळी बोलताना फडणवीस यांनी म्हटलं आहे.

पुढे बोलताना ते म्हणाले की, ऑरिक सिटी जे आपल्या पंतप्रधानांचं स्वप्न होतं, आपण देशातील पहिली



इंटीग्रेटेड इंड्स्टिअल टाउनशिप ही ऑरिक सिटीच्या रुपानं तयार केली. आणि आज एक मॅगनेट म्हणून आपल्याला ही डीएमआयसी आणि हा जो काही छत्रपती संभाजीनगरचा इकोसिस्टिम आहे, ती आपल्याला एखाद्या मॅगनेटसारखी दिसते. ज्यावेळी समृद्धी महामार्ग केला, डीएमआयसी केली, मी २०१५ मध्ये सांगायचो की महाराष्ट्रातील पुढील डेस्टिनेशन हे पुण्यानंतर छत्रपती संभाजीनगर असणार आहे, त्यावेळी अनेकांना ती अतिशोयोक्ती वाटयाची पण आज ते झालं आहे. ही जी काही विकासाची वाटचाल आहे ती मोठ्या वेगानं पुढे जात आहे. आमची तर टॅगलाईन आहे, आता महाराष्ट्र थांबणार नाही. पण तुम्हाला सांगतो छत्रपती संभाजीनगरही आता थांबणार नाही. मराठवाड्यात अनेक कंपन्या येत आहेत, किर्लोस्करचा प्रोजेक्ट इथे आला, जेएसडब्लूचा प्रोजेक्ट इथे आला. मी इथेल्या उद्योजकांचं देखील अभिनंदन करतो, त्यांच्या संघटांनी अतिशय चांगलं काम केलं आहे, असं यावेळी फडणवीस यांनी म्हटलं.

# अभिनेता रोहित देशमुखांची देवगिरी बँकेला सदिच्छा भेट



**छत्रपती संभाजीनगर :** जय मल्हार आणि बाळूमामाच्या नावानं चांगभलं यासह लोकप्रिय वेब सिरीजमधील भूमिकांमुळे ओळख असलेले अभिनेते रोहित देशमुख यांनी देवगिरी नागरी सहकारी बँकेच्या जवाहर कॉलनी येथील शाखेस सदिच्छा भेट दिली.

शाखा व्यवस्थापक सौ. संजीवनी शेजुळ यांनी त्यांचे औपचारिक स्वागत केले. या वेळी उपव्यवस्थापक सुनील देशमुख, अधिकारी प्राची वेताळ तसेच काव्य क्षीरसागर, सतीश त्रिभुवन, अभिषेक देशमुख, महेश पांढरपोटे, रतन तशेवाल, नेहा ठाकूर, प्रतीक्षा कर्डिले आदी कर्मचारी उपस्थित होते. या भेटीमुळे बँक आणि कला क्षेत्रातील सकारात्मक संवादास चालना मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



# साईबाबांचे दर्शन घेवून परतताना भीषण अपघात; चौघे ठार

**नाशिक :** नाशिक जिल्ह्यातील आंबेगन शिवाराजवळ राष्ट्रीय महामार्गावर शुक्रवारी सकाळी दोन वाहनांची समोरासमोर भीषण धडक झाली. या अपघातात चार प्रवाशांचा जागीच मृत्यू झाला, तर सहा ते सात प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत अशी माहिती पोलीसांकडुन समोर आली आहे.

अपघातात नाशिकहून पेठकडे जात असलेली कार आणि विरुद्ध दिशेने येणारी दुसरी कार धडकली. धडक इतकी जोराची होती की दोन्ही वाहनांचे अवशेष चक्काचूर झाले. मृतदेह शवविच्छेदनासाठी दिंडोरी ग्रामीण रुग्णालयात घेऊन जाण्यात आले आहेत.

जखमींवर नाशिक जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. जखमींमध्ये चार महिलांची प्रकृती गंभीर असल्याचे डॉक्टर्सनी सांगितले आहे. माहिती नुसार, प्रवासी शिर्डी येथे साईंचे दर्शन घेऊन नाशिकमार्गे गुजरातमधील वापीकडे जात असताना चाचडगाव टोलनाका पार केल्यानंतर अपघात झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून स्थानिक नागरिकांनी हळहळ व्यक्त केली आहे.

हे अपघात दोन दिवसांपूर्वी घडलेल्या भीषण अपघातासारखेच आहे. विशेष म्हणजे या अपघातात मृतकांमध्ये दीपक जगन डावखर (वय २२), आकाश मनोहर डावखर (वय २२), दीपक विजय जाधव (वय २२) यांचा समावेश आहे. जखमींमध्ये रुपेश गणेश भगत (वय १९) आणि रोशन गंगाधर डावखर यांचा समावेश आहे. प्रशासनाने अपघाताच्या कारणाची चौकशी सुरू केली आहे.

# कळमनुरी पुरवठा विभागाच्या लिपिकास लाच स्वीकारताना पकडले

**तभा वृत्त सेवा**

**हिंगोली, ८ जानेवारी :** तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार व त्यांचा भाऊ यांनी दिनांक १८/०९/ २०२२ रोजी त्यांचे कुटुंबीयांचे सदस्यांची नावे शिधापत्रिकेमध्ये समाविष्ट करून बी.पी.एल. योजने अंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळण्याकरिता तहसील कार्यालय कळमनुरी येथे अर्ज दाखल केला होता. त्यावरून तक्रारदार व त्यांच्या भावाला शिधापत्रिका मिळाली आहे. परंतु सध्या तक्रारदार व त्यांचे भावाला शिधापत्रिकेवर स्वस्त धान्य मिळत नाही. याबाबत तक्रारदार व त्यांचे भावाने बी.पी.एल. योजने अंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळण्याकरिता तहसील कार्यालय, कळमनुरी येथे वेळोवेळी अर्ज सादर केलेले आहेत. परंतु अद्याप पावतो त्यांना लाभ न मिळाल्याने, तक्रारदार व त्यांच्या भावाने दिनांक ०६/१०/२०२५ रोजी तहसील कार्यालय, कळमनुरी येथे प्राधान्य कुटुंब योजना (पी.एच.एच.) मध्ये समाविष्ट करून स्वस्त धान्य मिळवून देणेबाबत परत अर्ज केला आहे.

दिनांक ०८/१२/२०२५ रोजी तक्रारदार त्यांचे कामाचे अनुषंगाने पुरवठा विभागातील क्लर्क चक्रधर पंडितराव कदम यांना जाऊन भेटले. तेव्हा तक्रारदार व त्यांच्या भावाचे बी.पी.एल. योजने अंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळण्याच्या योजनेमध्ये नाव समाविष्ट करून लाभ मिळण्याचा अंतिम आदेश काढून देण्यासाठी कदम क्लर्क पुरवठा विभाग, तहसील कार्यालय कळमनुरी यांनी तक्रारदार व त्यांच्या भावाचे प्रत्येकी ४,०००/- रुपये असे दोघांचे मिळून ८,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याबाबत तक्रार प्राप्त झाली.

याप्रकरणी दिनांक ०९.१२.२०२५ रोजी यातील आरोपी लोकसेवक चक्रधर कदम, लिपिक/ टंकलेखक पुरवठा विभाग, तहसील कार्यालय कळमनुरी यांची पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली. पडताळणी दरम्यान तक्रारदार व त्यांच्या भावाचे बी.पी.एल. योजनेअंतर्गत अन्नधान्याचा लाभ मिळण्याच्या योजनेमध्ये नाव समाविष्ट करून अन्नधान्य मिळणेबाबतचा अंतिम आदेश काढून देण्यासाठी एका फाईलचे प्रत्येकी १,५००/- रुपये प्रमाणे दोन फाईलचे ३,०००/- रुपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्वतः स्वीकारण्यास सहमती दिल्याचे निष्पन्न झाले आहे.

सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक चक्रधर कदम, लिपिक/ टंकलेखक यांनी आज दि. ८/०१/२०२६ रोजी पुरवठा विभाग, तहसील कार्यालय, कळमनुरी ता. कळमनुरी जि. हिंगोली येथे त्यांचे चेंबरमध्ये तक्रारदार यांना लाचेची ३,०००/- रुपये रक्कम त्यांचे टेबलचे ड्रॉवरमध्ये टाकण्यास सांगून लाच रक्कम पंच साक्षीदार यांचे समक्ष स्वीकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. कळमनुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सदरील कारवाई उपाधीक्षक विकास घनवट यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक राजेश मलपिलू यांच्या पथकाने केली आहे.

# पोलिसांकडून उमेदवारावर थेट हद्दपार कारवाई

**सांगली :** कोरोना काळामुळे रखडलेल्या महापालिका निवडणुकीचा धुरळा उडाला आहे. एकीकडे आरोप प्रत्यारोप सुरू आहे, तर दुसरीकडे निवडणुकीच्या वादातून सोलापूर आणि अकोल्यात नेते आणि पदाधिकाऱ्याचा खुनामुळे गालबोट लागले आहे. अशातच आता सांगलीत ऐन निवडणुकीत अजित पवार गटाला मोठा धक्का बसला आहे. अजित पवार गटाच्या उमेदवारावर हद्दपारची कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळे सांगलीत एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सांगली महापालिका निवडणुकीत उपमुख्यमंत्री अजित पवारांना मोठा धक्का बसला आहे. ऐन प्रचाराच्या रणधुमाळीत राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या उमेदवारावर हद्दपारची कारवाई करण्यात आली आहे.

मिरजेत पोलिसांनी निवडणुकीच्या दृष्टीने स्थानिक गुन्हेगारांना हद्दपार करण्याची कारवाई केली आहे. यामध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रभाग ६ मधील उमेदवार आजम काझी यांच्यासह आठ जणांच्यावर ही हद्दपारीची कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, उद्या शुक्रवारी मिरजेत उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या दौरा आहे. त्याआधी झालेल्या या कारवाईमुळे मिरजेत एकच खळबळ उडाली आहे.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## एआय तंत्रज्ञान - डेटा सायन्स विषयांवर राष्ट्रीय परिसंवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** लातूरच्या अंबाजोगाई रोडवरील कॉक्सिट महाविद्यालयात नुकतेच एआय तंत्रज्ञान व डेटा सायन्स या विषयांवरील परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम.आर. पाटील हे होते.याप्रसंगी डॉ. बी.व्ही. धांद्रा, डॉ. आर. एस. हेगडी, डॉ. परागकावेरी, डॉ. राकेश देवरे, प्राचार्य डॉ. आर.एस. अवस्थी यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. डेटा सायन्समुळे मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या माहितीचे सुसूत्रीकरण करण्यास मदत झाल्याचे डॉ. धांद्रा यांनी सांगितले. डॉ. परागकावेरी यांनी क्लाऊड कॉम्प्युटिंगविषयी अत्याधुनिक माहिती दिली. डॉ. देवरे यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्स यावर महत्वपूर्ण सादरीकरण केले. तर डॉ. अवस्थी यांनी आंब्याच्या झाडावर ड्रोनच्या सहाय्याने फवारणी करण्याच्या तंत्रज्ञाची माहिती दिली. सदर राष्ट्रीय परिसंवाद डॉ. संतोष चौहान यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. त्यांना डॉ. दीपाली महामुनी यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुषमा मुंडे यांनी केले. परिसंवादास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# मनपा निवडणूकीचा प्रचार शिगेला

## लातूरचा सुजाण मतदार कोणाच्या बाजूने देणार 'कौल'?

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीचा प्रचार आता शिगेला पोहोचला आहे. प्रमुख राजकीय पक्षांसह प्रादेशिक पक्ष - अपक्ष, त्याचप्रमाणे भाजपच्या निष्ठावंतांची आघाडी लातूरच्या निवडणूक आखाड्यात उतरली आहे. सगळ्यांनीच प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसत असले तरी लातूरचा सुजाण मतदार कोणाच्या बाजूने कौल देणार? याकडे प्रत्येकाचे लक्ष लागून राहिले आहे.

लातूर शहर मनपाच्या स्थापनेपासूनची ही तिसरी सार्वत्रिक निवडणूक आहे. मनपाची मुदत संपून आता जवळपास तीन वर्षांचा कालावधी उलटून गेला आहे. पहिल्या निवडणुकीत काँग्रेसने तर दुसऱ्या निवडणुकीत भाजपने मनपावर ताबा मिळवला होता. यावेळच्या निवडणुकीत भाजप, भारतीय राष्ट्रीय काँग्रेससह अजित पवारांची राष्ट्रवादी काँग्रेसही पूर्ण ताकदीनिशी मैदानात उतरली आहे. लातुरात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस महायुती एकत्रित लढण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, अखेरच्या क्षणी वाटाघाटी फिस्कटल्याने महायुतीतील हे दोन्ही प्रमुख घटक पक्ष स्वतंत्ररित्या लढत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या या निवडणुकीत आपआपल्या कार्यकर्त्यांना अधिक संधी देता यावी या दृष्टीने स्वतंत्र लढणेच योग्य असल्याच्या प्रतिक्रिया पक्ष कार्यकर्त्यांसह सामान्य मतदारांतूनही व्यक्त केल्या जात होत्या.

या निवडणुकीच्या प्रचारासाठी उमेदवारांना अधिकचा वेळ मिळणार नसल्याने उर्वरित वेळेत जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रत्येक उमेदवारांचा प्रयत्न आहे. शहराच्या सर्वच भागात सध्या भल्या सकाळपासून उमेदवार मतदारांच्या गाठी - भेटीसाठी फिरताना दिसत आहेत. प्रभाग मोठा आणि प्रचाराला वेळ कमी असल्याने उमेदवारांची आणि त्यांच्या कार्यकर्त्यांची तारांबळ उडत असल्याचे पाहायला मिळत आहे. प्रचारासाठी कार - ऑटो - टेंपोसह छोट्या छोट्या वाहनांचा उपयोग केला जात आहे. उमेदवारांच्या प्रचाराच्या भोंग्यांनी सध्यस्थितीत लातूरकरांचे कान अक्षरशः बधिर होण्याची पाळी येऊन ठेपल्यागत झाले आहे. एका उमेदवाराच्या प्रचाराचा भोंगा गेला की दुसऱ्या उमेदवाराचा भोंगा दारापुढून जात असल्याने आता मतदारांनाही मनपा निवडणुकीच्या प्रचाराने आघाडी घेतल्याचे चांगलेच लक्षात येत आहे.

कडाक्याच्या थंडीत प्रचारासाठी जाताना उमेदवारांनाही अक्षरशः गारठल्यासारखे होत असल्याचे निदर्शनास येत आहे. मध्यंतरी ढगाळ वातावरणामुळे थंडीचे प्रमाण अंशतः घटले होते. तेव्हा अनेकांनी थंडी गेल्याचा आनंद व्यक्त केला होता. मात्र, मागच्या दोन दिवसांपासून थंडीचे पुन्हा कासवगतीने आगमन झाले आहे. किमान मनपा निवडणूक पार पडेपर्यंत तरी ही थंडी कायम राहील असा अंदाज आहे. त्यामुळे उमेदवारांना आपला उर्वरित प्रचार कडाक्याच्या थंडीचा सामना करतच पूर्ण करावा लागणार आहे. या निवडणुकीच्या प्रचारात आता सगळ्यांनीच आघाडी घेतली आहे. लातुरात भाजपच्या निष्ठावंत पण नाराज कार्यकर्त्यांनी भाजपासमोर आव्हान उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे भाजपच्या मतांवर नाही म्हटले तरी थोडाफार प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नाराज निष्ठावंत नसते तर मात्र भाजपच्या यासहचा मार्ग सोपा झाला असता, अशीही मतदारांत चर्चा आहे. लातूरचा मतदार सुजाण आणि अतिशय चाणाक्ष आहे. तो शेवटपर्यंत कोणाच्या पारड्यात आपले मत टाकणार आहे, याचा थांग लागू देत नसल्याने ही निवडणूक अतिशय चुरशीची आणि अटीतटीची होण्याची चिन्हे आहेत.

## वीर माहेश्वर पतसंस्था दिनदर्शिकेचे प्रकाशन



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** येथील वीर माहेश्वर अर्बन को. ऑप. क्रेडिट सोसायटीच्या वतीने नूतन वर्षाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन गुरुवारी दुपारी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रकाशन प्रसंगी डॉ. मन्मथ स्वामी, कुमारस्वामी गणाचार्य, पतसंस्थेचे उपाध्यक्ष विजयकुमार मठपती, सचिव अशोक मठपती गुरुजी, विलास स्वामी गुरुजी, बसवराज स्वामी चिट्टे , बसवराज स्वामी लिंबाळकर, दत्तात्रय स्वामी बसपुरे, शिवकांत स्वामी, पतसंस्थेचे व्यवस्थापक अमोल हलगरकर, श्रीधर स्वामी, रामानंद स्वामी, प्रमोद सुरवसे, महेश स्वामी गणाचार्य आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपले विचार व्यक्त करताना सचिव अशोक मठपती यांनी संस्थेच्या वतीने प्रतिवर्षी दिनदर्शिका प्रकाशन सोहळा आयोजित केला जातो असे सांगितले. ही दिनदर्शिका पतसंस्थेच्या सर्व सभासदांना वितरित केली जाते. सर्व सभासदांनी लोकशाहीने आपल्याला दिलेला मतदानाचा अधिकार मतदान करून अवश्य बजावावा, असे आवाहनही त्यांनी केले.

## माजी खा. सुधाकर श्रृंगारे यांचा भाजपात प्रवेश



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** लातूर लोकसभा मतदार संघाचे माजी खासदार सुधाकर श्रृंगारे यांनी गुरुवारी भाजपात प्रवेश केला. माजी मंत्री तथा निवडणूक प्रमुख आ. संभाजी पाटील निलंगेकर, आ. अभिमन्यू पवार, डॉ. सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या उपस्थितीत श्रृंगारे यांचा पक्षप्रवेश संपन्न झाला.

लातूर लोकसभा मतदारसंघातून २०१९ च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या तिकीटावर सुधाकर श्रृंगारे हे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले होते. यावेळी माजी खा. श्रृंगारे यांची मुलगी सौ. सुप्रिया पायाळ यांनीही भाजपामध्ये प्रवेश केला. शहरातील पाटील प्लाझा येथे भारतीय जनता पक्षाच्या निवडणूक कार्यालयात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'नवोदय' मृत्यू प्रकरणी पालकमंत्र्यांचा आढावा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन विद्यार्थिनीच्या मृत्यूप्रकरणी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी आढावा घेऊन तपास गतीने आणि पारदर्शकपणे करण्याच्या सूचना दिल्या.जवाहर नवोदय विद्यालयातील अल्पवयीन मुलीच्या मृत्यूबद्दल अनेक शंका व्यक्त केल्या जात आहेत. त्या पार्श्र्वभूमीवर जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांसह प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत पालकमंत्री भोसले यांनी बैठक घेतली. घडलेली घटना अतिशय दुर्दैवी असून या प्रकरणी पोलिसांनी निष्पक्ष पद्धतीने तपास करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

या प्रकरणात आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती पोलीस प्रशासन आणि जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रशासनाने दिली.

## ग्रंथालय हे विद्यार्थ्यांचे बौद्धिक सामर्थ्य वाढविणारे केंद्र : प्राचार्य डॉ. कटारे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** अवांतर वाचनामुळे विचारक्षमतेचा विस्तार होऊन व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. नियमित वाचनाची सवय विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांसह आत्मविश्वास वाढवते. नियमित वाचनातून चिकित्सक विचारशक्ती, भाषिक कौशल्ये आणि आत्मविश्वास वाढतो. वाचनाची सवय ही आयुष्यभर साथ देणारी संपत्ती आहे. सर्व विद्यार्थ्यांना वाचनाशी मैत्री करावी. ग्रंथालय हे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक, वैचारिक आणि सांस्कृतिक जडणघडणीचे प्रमुख केंद्र त्यातूनच विद्यार्थी घडतो, असा विश्वास प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी व्यक्त केला.

दयानंद शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव





येथे मराठी विभाग आणि ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित अवांतर वाचन संकल्प सप्ताह च्या उद्घाटन प्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, महाविद्यालयामध्ये वाचन सप्ताहाचे आयोजन करून सप्ताहभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामध्ये पुस्तक प्रदर्शन, वाचन प्रेरणा सत्रे, चर्चा परिसंवाद, निबंध लेखन स्पर्धा, कथालेखन स्पर्धा, वाचन अनुभव कथन यांचा समावेश असणार आहे. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्याचा महाविद्यालयाचा प्रयत्न आहे. कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मराठी विभाग प्रमुख डॉ. जयदेवी पवार, अभ्यासक्रमा बाहेरील वाचनाचे महत्त्व, व्यक्तिमत्त्व विकासात वाचनाची भूमिका, विचारक्षमतेचा विस्तार, भाषिक समृद्धी आणि सामाजिक जाणीव वाढविण्यात अवांतर वाचन कसे उपयुक्त ठरते याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तर ग्रंथालयातील विविध साहित्यप्रकार कथा, कादंबऱ्या, चरित्रे, वैचारिक व प्रेरणादायी ग्रंथ,इनसायक्लोपीडिया यांची ओळख करून देत नियमित वाचनाची सवय लावण्याचे आवाहन यावेळी ग्रंथपाल डॉ.महावीर कटके यांनी केले. यावेळी अवांतर वाचनाच्या या उपक्रमामध्ये महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. कार्यक्रमाला डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. अजित भांजी, प्रा.चंद्रकांत मोरे, डॉ. मा.ना. गायकवाड, प्रा. विवेक गोस्वामी, सगर यांची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन प्रा. शितल खोत यांनी केले.

## प्रा.डॉ.नारनवरेंना सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, ८ जानेवारी :** निलंगा तालुक्यातील औराद शहाजानी





येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयातील मराठी विषयाचे प्रा.डॉ.अशोक उद्धव नारनवरे यांना ग्रामीण जनता शिक्षण प्रसारक मंडळ, चलबुर्गा, ता.औसा, जि.लातूर यांच्या वतीने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मा.अभिमन्यू पवार (आमदार, औसा विधानसभा मतदारसंघ) यांच्या हस्ते 'सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, मानपत्र, ग्रंथ व शाल असे होते.

दि.३ जानेवारी रोजी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त श्रीमती लक्ष्मीबाई ढेंकरे माध्यमिक विद्यालय, फत्तेपूर, ता.औसा येथे 'सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार' वितरण समारंभ आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी व्यासपीठावर ग्रामीण जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रा.दत्तात्रय सुरवसे, सचिव ड.बाबुराव मोरे, फत्तेपूर च्या सरपंच अनिता माळी, श्रीमती सुशीलादेवी देशमुख वरिष्ठ महाविद्यालय, लातूर येथील प्रो.सविता किर्ते, मुख्याध्यापक अनिल मुळे इत्यादी उपस्थित होते.

प्रा.डॉ.अशोक नारनवरे यांना 'सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार' मिळाल्याबद्दल, शारदोपासक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बस्वराज वलांडे, उपाध्यक्ष राजेश वलांडे, सचिव रमेश बगदुरे, उपसचिव पंकज बियाणी, सर्व संचालक मंडळ तथा संस्था सदस्य, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य तथा मराठी विभागप्रमुख डॉ. शंकर कल्याणे, प्रा.बलभीम सातपुते, डॉ.सचिन हंचाटे, डॉ. प्रदीप पाटील, डॉ.जाफर चौधरी, प्रा.सुनील सर्वज्ञ, प्रा.विकास पाटील, संजीवकुमार होसुरे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी प्रा.डॉ.अशोक नारनवरे यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## डिप्लोमा परीक्षा निकालात 'एम एस बिडवे' ची भरारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** नुकताच महाराष्ट्र राज्य बोर्ड ऑफ टेक्निकल एज्युकेशन यांनी डिप्लोमा हिवाळी परीक्षेचा निकाल जाहीर केला. या निकालामध्ये एम एस बिडवे अभियांत्रिकी महाविद्यालयात मागील वर्षापासून सुरू झालेल्या डिप्लोमा शाखेने उत्कृष्ट निकालाची परंपरा राखली आहे.

द्वितीय वर्ष सिविल अभियांत्रिकी मधून कु.ज्योती मंत्री हिने ८७.१८ इतके गुण तर प्रथम वर्षामध्ये कु. पायल श्रेया राजू हिने ८५% इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला.

द्वितीय वर्ष संगणक अभियांत्रिकी मध्ये सुनील पाटील याने ८८% इतके गुण मिळवले तसेच प्रथम वर्षात कु. संध्या कांबळे हिने ८७.५० इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक राखला.

विद्युत अभियांत्रिकी मध्ये कु. अदिबा कासार हिने द्वितीय वर्षात ८८.१२ इतके गुण मिळवले तर प्रथम वर्ष विद्युत अभियांत्रिकी मध्ये वेदांत मुळे याने ८२.१२% इतके गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला.

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाच्या द्वितीय वर्षांमध्ये कु.ऋतुजा मार्कड हिने ७८.११% इतके गुण मिळवून प्रथम क्रमांक तर प्रथम वर्षामध्ये कु. सायली कवठे हिने ८६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. माहिती तंत्रज्ञान विभागामध्ये द्वितीय वर्षांमध्ये रियाज गस्ते याने ८३.१८% गुण मिळवून प्रथम क्रमांक तर प्रथम वर्षामध्ये प्रसाद सिंग ठाकूर याने ८७.३०% इतके गुण मिळवत प्रथम क्रमांकाचा मान मिळवला.

मेकॅनिकल विभाग द्वितीय वर्षामध्ये कु.शाहूबाई जाधव हिने ८०.५६ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला तर प्रथम वर्षामध्ये कु. प्राची पंडिकोंडे हिने ७५ टक्के इतके गुण मिळवत प्रथम क्रमांकावर बाजी मारली. तसेच संपूर्ण महाविद्यालयाचा निकाल हा ८२.२५ टक्के लागला.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे, उपाध्यक्ष माधवराव पाटील चिंचोलीकर, सचिव माधवराव पाटील टाकळीकर, सहसचिव सुनील मिटकरी, कोषाध्यक्ष विजय रेवडकर, कार्यकारी संचालक प्रदीप दिंडेगावे, संचालक राजेश्र्वर बुके, बस्वराज एरटे, काशिनाथ साखरे, सौ. ललिताताई पांढरे, महेश हलगे, बाबुराव तरगुडे, श्री गुरुलिंग धाराशिवे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

याप्रसंगी महाविद्यालयाचे परिसर संचालक डॉ मोहन बुके, प्राचार्य डॉ. एस एम. जगदे, उपप्राचार्य प्रा. विरभद्र बाळे, निबंधक डॉ. सौ. ज्योती पाटील, डिप्लोमा प्रमुख डॉ. सुरज दामरे, प्रथम वर्ष प्रभारी प्रा. एन.के. प्रयाग यांनी सर्व विद्यार्थ्यांचे व संबंधित प्राध्यापकांचे कौतुक व अभिनंदन केले आहे.

## महात्मा फुलेंच्या क्रांतीने सामाजिक परिवर्तन शक्य : डॉ. कुंभार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, ८ जानेवारी :** स्त्री-पुरुष समानता, शिक्षण आणि जातीव्यवस्थेविरुद्ध शेवटच्या श्वासापर्यंत महात्मा जोतीराव फूले यांनी संघर्ष केला. समाजात समताधिष्ठित मूल्ये रुजावी, यासाठी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य समाजासाठी अभिमानास्पद, प्रेरणादायी आहे. महात्मा फूलेंच्या वैचारिक क्रांतीने सामाजिक परिवर्तन शक्य असल्याचे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत डॉ. नागारोव कुंभार यांनी केले.

बुधोडा ता. औसा येथील माझं घर प्रकल्पात महात्मा जोतिराव फूले यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. यावेळी डॉ कुंभार प्रमुख उद्घाटक म्हणून बोलत होते. याप्रसंगी लेखिका अरूणा दिवेगावकर, प्रमोद झिंझाडे, राजेंद्र कासार, हरिश्र्चंद्र सूडे, ड. शोभाताई गोमारे, डॉ. निलम पन्हाळे,माया सोरटे,



रंजना चव्हाण,रंजना हासूरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

बोलताना डॉ. नागारोव कुंभार म्हणाले की, महात्मा फुले यांनी सर्व जाती-धर्मांच्या लोकांना समान संधी मिळवून देण्याबरोबरच ब्राह्मणवादी वर्चस्वाला आव्हान देण्याचे कार्य केले. ज्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणा मिळाली. समतेच्या लढ्यात शिक्षण हेच सामाजिक बदलाचे प्रमुख साधन मानून त्यांनी मुलींसाठी आणि बहुजन समाजासाठी भारतातली पहिली शाळा सुरू केली. सर्वांना समान ज्ञान यापध्दतीने शिक्षणाची व्यवस्था उभी केली. जातीभेदावर आधारित विषमतेला जोरदार विरोध केला. ब्राह्मण्यवादी वर्चस्वाला आव्हान दिले. स्त्रिया शिक्षीत झाल्या तरच समाज प्रगती करेल यावर त्यांचा विश्र्वास होता. त्यामुळे त्यांनी विधवा पुनर्विवाह व बालविवाहासारख्या प्रथांविरुद्ध आवाज उठवला. आज विविध क्षेत्रात महिलांची होणारी प्रगती महात्मा जोतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केलेल्या सामाजिक परिवर्तनाच्या लढ्याच्या कामाची पावती आहे.

स्त्री-मुक्तीच्या चळवळीचा पाया महात्मा फूले यांनी घातला. सामाजिक प्रबोधनाचे, परिवर्तनाचे पहिले पाऊल त्यांनी घट्ट रोवले. स्त्री ही पारंपरिक रुढीच्या दास्यातून खऱ्या अर्थाने मुक्त व्हायची असेल तर तिला शिक्षण दिले पाहिजे याचा आग्रह त्यांनी धरला. हिंदूंच्या धर्मग्रंथात सांगितलेला सिद्धांताचा फोलपणा दाखवून देत ब्राह्मणी व्यवस्थेच्या वर्चस्वाच्या मूलाधारालाच त्यांनी धक्का देण्याचे काम केले. महात्मा फुले हे एक प्रचंड असे समाज परिवर्तनाचे, समाज सुधारणेचे, धगधगत्या पण वास्तववादावर उभे असलेल्या सामाजिक विचारांचे पहिले भारतीय समाज विद्यापीठ होते असेही डॉ. कुंभार म्हणाले. कार्यक्रमासाठी संगीता झरे, दगडूसाहेब पडिले, सतिष सोनकांबळे, पांडूरंग जाधव, सुनिल हेंगणे, रफिक पटेल, कपिल शेवाळे,निंबराज बिरादार, बस्वराज अष्टपुत्रे, संतोष साखरे आदींनी परिश्रम घेतले.

## थोडक्यात...

### रियलमी १६ प्रो सिरीजचे अनावरण

**छत्रपती संभाजीनगर :** रियलमीने प्रीमियम मिड-रेंज सेगमेंटसाठी



रियलमी १६ प्रो सिरीज लाँच केली. या सिरीजमध्ये रियलमी १६ प्रो प्लस आणि रियलमी १६ प्रो या दोन मॉडेल्सचा समावेश आहे. रियलमी १६ प्रो प्लसमध्ये २०० एमपी कॅमेरा, स्नॅपड्रॅगन ७ जेन ४ चिपसेट, ७००० एमएएच बॅटरी आणि इको-फ्रेंडली बायो-बेस्ड बॅक कव्हर देण्यात आले आहे. हा फोन मास्टर गोल्ड, मास्टर ग्रे व कॅमेलिया पिंक रंगांत ३५,९९९ पासून उपलब्ध आहे. रियलमी १६ प्रोमध्ये २०० एमपी कॅमेरा, मीडियाटेक डायमेन्सिटी ७३००-मॅक्स ५जी चिपसेट, ७००० एमएएच बॅटरी असून त्याची किंमत २८,९९९ पासून सुरू होते. यासोबत रियलमी बड्स एअर ८ (३,७९९), रियलमी पॅड ३ (२४,९९९*) आणि रियलमी स्मार्ट पेन (२,९९९) देखील लाँच करण्यात आले आहेत.

### हिंदू संमेलन समिती कार्यालयाला हभप रामगिरीजी महाराजांची सदिच्छा भेट

**गंगापूर :** हिंदू धर्म, परंपरा,संस्कृती व मूल्यांचे संरक्षण आणि संवर्धनया उदात्त उद्देशाने गंगापूर येथे १६ जानेवारीरोजी सायंकाळी ५ वाजता, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मैदानावर येथे पार पडणार आहे. या संमेलनाच्या तयारीच्या अनुषंगाने मंगळवारी बेटाचे महंत रामगिरीजी महाराज यांनी संपर्क कार्यालयास भेट देऊन संपूर्ण तयारीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी नियोजन, व्यवस्थापन उपस्थितीबाबत आवश्यक सूचना केल्या. हिंदू संमेलनासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहनजी भागवत उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे संघ परिवाराकडून नियोजनबद्ध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### हिंदू संमेलन समितीच्या वतीने श्री स्वामी समर्थ केंद्रात पत्रकाचे वाटप

**गंगापूर :** हिंदू संमेलन समितीच्या वतीने गंगापूर येथील श्री स्वामी समर्थ केंद्र येथे पत्रकाचे वाटप करण्यात आले व उपस्थिततांना कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले. दिनांक १६ जानेवारी रोजी शहरातील जिल्हा परिषद मैदान येथे हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे राष्ट्रीय सरसंघचालक मोहनजी भागवत उपस्थित राहणार आहेत. यावेळी श्री स्वामी समर्थ केंद्राचे केंद्रप्रमुख झुंजारराव काकडे सुधाकर सपकाळ रवींद्र पाटील सौ सोळके ताई श्रीमती मनीषाताई सूर्यवंशी यांच्या सह श्री स्वामी समर्थ सेवेकरी उपस्थित होते.

### नवीन वर्ष, नवीन युग; तीच मोहकता-प्रियमवदा कांत

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्हीवरील 'घरवाली पेडवाली' मालिकेत लतिकाची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्री प्रियमवदा कांत यांच्यासाठी १ जानेवारी हा दुहेरी आनंदाचा दिवस आहे. नवीन वर्षाची सुरुवात आणि वाढदिवस एकाच दिवशी येत असल्याने २०२६ मध्ये त्या उत्साह, कृतज्ञता आणि नव्या ऊर्जेसह पुढील वाटचालीस सज्ज झाल्या आहेत. मनोरंजनसृष्टीतील १५ वर्षांचा प्रवास साजरा करताना प्रियमवदा म्हणाल्या की, नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी जन्म झाल्याने स्वतःला भाग्यवान समजते. यंदा त्यांनी वाढदिवस साधेपणाने साजरा केल्याचे सांगितले. 'हप्पू की उलटन पलटन' रात्री ९.३०, 'घरवाली पेडवाली' रात्री १० आणि 'भाबीजी घर पर है २.०' रात्री १०.३० वाजता एण्ड टीव्हीवर प्रसारित होत असून हे सर्व एपिसोड्स झी५ वरही उपलब्ध आहेत.

### 'हर घर योग' उपक्रम लाँच

**मुंबई :** हॅबिल्ड या भारतातील पहिल्या उत्तम सवय अंगिकारण्यास साह्य करणाऱ्या प्लॅटफॉर्मने आपला प्रमुख उपक्रम 'हर घर योग'च्या लाँचची घोषणा केली आहे, जेथे व्यक्तींना २१-दिवस मोफत योग प्रवासाच्या माध्यमातून साधे, दररोज योग करण्याची सवय अंगिकारत वर्षाची सुरूवात आरोग्यदायी करण्यास प्रेरित करण्यात आले आहे. लहान, वारंवार केल्या जाणाऱ्या कृतींमधून आरोग्यदायी सवयी निर्माण होतात या विश्र्वासावर आधारित उपक्रम 'हर घर योग' सर्व वयोगटातील, लिंग व भौगोलिक क्षेत्रांमधील व्यक्तींना कोणत्याही दबावाशिवाय, परिपूर्णपणे त्यांचा योग प्रवास सुरू करण्यास किंवा पुन्हा सुरू करण्यास प्रेरित करतो, ज्यासाठी महागड्या सेटअपची गरज नाही.

### सिल्लोड पंचायत समिती येथे आमसभेचे आयोजन

**सिल्लोड :** सिल्लोड पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात आमदार अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली दि.१२ जानेवारी २०२६ सोमवार रोजी दुपारी १ वाजता आमसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या आमसभेत तालुक्यातील विविध नागरी समस्या, विकासकामांचा आढावा तसेच शासनाच्या योजना याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. या आमसभेमध्ये नागरिकांना आपले प्रश्न व सूचना मांडण्याची संधी मिळणार असून प्रशासनाकडून त्यावर योग्य तो मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### पंढरी गोढरे यांचे निधन

**सोयगाव :** भवानीनगर येथील पंढरी अर्जुन गोढरे (वय.६०)



यांचे दि.८ गुरुवार रोजी दुपारी १:४५ वाजता अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांचेवर संध्याकाळी ६:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सुन, नातवंडे असा परिवार आहे. पत्रकार कृष्णा पाटील जुनघरे यांचे ते व्याही होत.

# पक्षांतर्गत गैरसमजांमुळे कारवाई

## पालकमंत्र्यांच्या हस्तक्षेपाने राजकीय समीकरणात बदल : ॲड. डोणगावकर

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर दि.८ जानेवारी :** भारतीय जनता पार्टीतील काही हितचिंतकांनी वरिष्ठ नेतृत्वाकडे चुकीची माहिती दिल्यामुळे आपल्यावर पक्षविरोधी ठरविण्यात आल्याचा गंभीर आरोप भाजपचे कार्यकर्ते ॲड. अरविंद डोणगावकर यांनी केला आहे. तब्बल २५ वर्षांपासून पक्षासाठी निष्ठेने कार्य करत असतानाही अशा प्रकारची हकालपट्टीची कारवाई करण्यात आल्याने ती बाब अत्यंत वेदनादायक असल्याचे त्यांनी पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले.

वरिष्ठ नेतृत्वाच्या कानावर चुकीची माहिती घालण्यात आल्यामुळे ही कारवाई झाली असल्याचे नमूद करत, आपण सदैव पक्षवाढीसाठी प्रामाणिकपणे काम केल्याचा दावा त्यांनी केला. जनतेच्या सेवेसाठी केलेल्या कार्याची दखल घेत शिवसेना (शिंदे गट) चे नेते व जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी तातडीने संपर्क साधून पक्षाचा 'बी-फॉर्म' दिला. त्यामुळे स्थानिक राजकीय



समीकरणांमध्ये महत्त्वपूर्ण बदल घडून आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, शहरातील दीर्घकालीन पाणीप्रश्नाबाबतही ॲड. डोणगावकर यांनी माहिती दिली. महाराष्ट्र शासन व महापालिकेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सुमारे ९० टक्के पाण्याच्या टाक्यांची कामे पूर्ण झाली असून, पुढील २५ वर्षांचा पाणीप्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल, असे नियोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. याच पार्श्वभूमीवर ॲड. अरविंद डोणगावकर यांच्या पत्नी सौ. सविता अरविंद डोणगावकर या शिवसेना (शिंदे गट) तर्फे प्रभाग क्रमांक १९ (ब) मधून निवडणूक लढवत आहेत. प्रचारादरम्यान त्यांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासाला प्राधान्य देण्याची भूमिका स्पष्ट केली आहे.

प्रभागातील महिला सुरक्षेचे प्रश्न, युवकांमध्ये वाढत असलेल्या व्यसनाधीनतेवर प्रभावी नियंत्रण, महिला व युवकांसाठी रोजगारनिर्मिती, वेळेवर घंटागाडी सेवा, ड्रेनेजच्या समस्या सोडवणे तसेच मंजूर निधीचा योग्य व पारदर्शक वापर करणे, या मुद्यांवर विशेष लक्ष देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. नियोजनबद्ध विकास, उत्तरदायित्व आणि पारदर्शक प्रशासन या त्रिसूत्रीच्या आधारे प्रभागाचा विकास साधण्याचा ठाम विश्वास सौ. सविता डोणगावकर यांनी व्यक्त केला आहे.

# 'आयएमए' शिष्टमंडळाची महसूलमंत्र्यांशी बैठक

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर दि.८ जानेवारी :** इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र राज्याच्या वतीने सहसचिव डॉ. अनुपम टाकळकर यांच्या



नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने माननीय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेऊन राज्यातील क्लिनिक, डे-केअर सेंटर तसेच लहान व मध्यम रुग्णालयांना भेडसावणाऱ्या नियामक, प्रशासकीय व धोरणात्मक अडचणींबाबत सखोल आणि संरचित चर्चा केली. या बैठकीदरम्यान आयएमएतर्फे तयार करण्यात आलेले अधिकृत निवेदन मंत्री महोदयांना सादर करण्यात आले.

या चर्चेत प्रामुख्याने ५० बेडपेक्षा कमी क्षमतेच्या रुग्णालयांवर लागू असलेल्या एमपीसीबी नोंदणी, बँक गॅरंटी आणि दंडात्मक तरतुदींचा असमंजस भार हा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. या आरोग्य संस्थांकडून अत्यल्प जैववैद्यकीय कचरा निर्माण होत असून तो अधिकृत संस्थांमार्फत शास्त्रीय पद्धतीने व्यवस्थापित केला जातो. त्यामुळे अशा रुग्णालयांना औद्योगिक घटकांप्रमाणे वागणूक देणे व्यवहार्य नसून, ५० बेडखालील संस्थांना सवलत आणि ५० ते २०० बेड क्षमतेच्या रुग्णालयांसाठी प्रमाणानुसार नियम लागू करण्याची मागणी करण्यात आली.

यासोबतच विविध विभागांकडून होणाऱ्या ओव्हरलॅप तपासण्या, अनेक नोंदण्या व परवानग्यांमुळे वाढणारा प्रशासकीय भार कमी करण्यासाठी सिंगल विंडो डिजिटल प्रणाली राबविण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. धोरणनिर्मिती प्रक्रियेत आयएमएशी सातत्यपूर्ण संवाद ठेवावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

डॉ. अनुपम टाकळकर यांनी एमटीपी कायदा व अंमलबजावणीतील व्यावहारिक अडचणी, किरकोळ प्रक्रियात्मक त्रुटींमुळे होणारी दंडात्मक कारवाई, स्पष्ट मार्गदर्शक सूचना व डिजिटल सोल्यूशन्सची आवश्यकता याबाबत आयएमएची भूमिका मांडली. याशिवाय नर्सिंग स्टाफची कमतरता, डे-केअर सेंटरसाठी सुलभ नियम आणि डॉक्टर संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी हे मुद्देही चर्चेत आले.

एमजेपीजे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व मुद्यांची नोंद घेत धोरणात्मक पातळीवर त्यांचा आढावा घेतला जाईल, असे आश्वासन दिले. या बैठकीत डॉ. योगेश लक्कास व डॉ. दत्तात्रय कदम यांचे सक्रिय सहकार्य लाभले, तर आयएमए महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ. संतोष कुलकर्णी आणि सचिव डॉ. विक्रांत देसाई यांनी मार्गदर्शन केले.

# एमजीएममध्ये राष्ट्रीय हिंदी परिषद संपन्न

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर दि.८ जानेवारी :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठातील भारतीय तथा विदेशी भाषा संस्थेच्या वतीने ग़ज़लकार दुष्यंत कुमार यांच्या ५० व्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय हिंदी परिषदेचा समारोप समारंभ आईनस्टाईन सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोप समारंभास हिंदी प्रचार सभेचे अध्यक्ष डॉ. चंद्रदेव कवडे, सुप्रसिद्ध कवि ग़ज़लकार प्रदीप निफाडकर, प्रसिद्ध ग़ज़लकार आलोक त्यागी, श्रीमती ममता त्यागी, एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, माजी कुलगुरू डॉ. सुधीर गव्हाणे, डॉ.संजय मोहड, अधिष्ठाता डॉ.रेखा शेळके, संचालक डॉ. के.पी.सिंग व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत. या परिषदेत ५० पेक्षा अधिक शोधनिबंध आले होते, त्यातील ३१ शोधनिबंधांचे वाचन करण्यात आले. ही परिषद यशस्वी करण्यासाठी डॉ. शहनाज बासमेह, डॉ. सुरेखा लक्कस, डॉ.राम गायकवाड, डॉ.मारोती गायकवाड, डॉ.साजिद आलम, प्रा. अनिता फुलवाडे, डॉ.सुप्रिया सांगवीकर, डॉ.प्रज्ञा कोनार्डे, डॉ. देशमुख, डॉ.रेहाना सय्यद, डॉ. अस्वद गोव्हर, सामाजिकशास्त्रे व मानव्यविद्या शाखेचे प्राध्यापक व सर्व संबंधितांनी योगदान दिले.

या समारोप समारंभात हिंदी प्रचार सभा अध्यक्ष डॉ. चंद्रदेव कवडे, सुप्रसिद्ध कवी व ग़ज़लकार प्रदीप निफाडकर, सुप्रसिद्ध ग़ज़लकार आलोक त्यागी, कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ आदी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

# 'रब्बी'साठी आ. सत्तार यांच्या हस्ते 'खेळणा'तून वर्तन सोडले

**तभा.वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि.८ जानेवारी :** पालोद ता. सिल्लोड येथील खेळणा मध्यम प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी आज माजी मंत्री आ. अब्दुल सत्तार यांचाहस्ते आवर्तन सोडण्यात आले. प्रारंभी आ. अब्दुल सत्तार यांच्याहस्ते खेळणा मध्यम प्रकल्पात जलपूजन करून कालव्यातून पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला. खेळणातुन आवर्तन सोडण्यात आल्याने रब्बी पिकांना याचा मोठा फायदा होणार आहे.

खेळणा मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस झाल्याने यावर्षी सप्टेंबर अखेरच खेळणा मध्यम प्रकल्प ओव्हरफलो झाला होता. आज मितीला खेळणा धरणात ८१ टक्के जलसाठा आहे. त्याअनुषंगाने सिंचनासाठी आरक्षित पाण्याचा विसर्ग करण्याची प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश आ. अब्दुल सत्तार यांनी



संबंधित अधिकाऱ्यांना दिले होते.त्याची अंमलबजावणी आज करण्यात आली.

खेळणा मध्यम प्रकल्पातून आवर्तन सोडण्यात आल्याने यामुळे २ हजार ५०० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येवून रब्बी पिकांना लाभ होणार आहे. शिवाय परिसरातील विहिरींनाही फायदा होणार असल्याने लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांना रब्बीतील उत्पन्नात वाढ होईल असा विश्र्वास आ. अब्दुल सत्तार यांनी व्यक्त केला.

खेळणा मध्यम प्रकल्पातून आवर्तन सोडण्यात आल्याने तालुक्यातील, पालोद, मंगरुळ, दहेगाव, अन्वी, डोंगरगाव तर भोकरदन तालुक्यातील आव्हाणा, सुभानपुर, मालखेडा येथील शेतकऱ्यांना लाभ होणार आहे.

शेतकऱ्यांना किमान तीन वेळा आवर्तन सोडण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करा असे निर्देश आ. अब्दुल सत्तार यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार योजनेची प्रभावी अंमलबजावणी करा जेणेकरून धरणातील पाणी साठा वाढेल असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले. धरण क्षेत्राची सीमा निश्रि्चत करणे, धरणाच्या पाळू वरील झाडे झुडपे काढणे, कालव्याचे काँक्रीटीकरण करण्याबाबत प्रस्ताव सादर करणे, याबाबत आ. अब्दुल सत्तार यांनी अधिकाऱ्यांना निर्देशित केले.

याप्रसंगी सेवानिवृत्त विभागीय निबंधक देविदास पालोदकर, माजी सभापती रामदास पालोदकर, पाटबंधारे विभागाचे शाखा अभियंता प्रीतम राठोड, कॅनॉल निरीक्षक सोमनाथ ताठे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक जयराम चिंचपुरे, राजेंद्र ठोंबरे, मधुकर गवळी, निजाम पठाण, शंकरराव खांडवे, नाना पांढरे, गुलाबराव मिरगे, प्रभाकर बन्सोडे, वकील पठाण, शेख मोईज, अशोक पालोदकर, संजय डमाळे, विश्वास जंजाळ, कल्याण डवणे, अंकुश पाटील, मधुकर मिरगे, शिवाजी बर्डे, निखिल पालोदकर आदींसह गावकरी, परीसरातील शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### वेडसर प्रेयसीच्या भूमिकेत गौरी अगरवाल

**छत्रपती संभाजीनगर :** झी टीव्हीवरील 'जाने अनजाने हम मिले' मालिकेत मोठा ट्विस्ट येत असून राघवला ब्लॅकमेल करणारे मॉर्फ फोटो कीर्तीनेच तयार केल्याचे उघड होणार आहे. सुरुवातीला सकारात्मक असलेली कीर्ती भावनिक फसवणुकीमुळे वेडसर प्रेमाकडे वळते. ही भूमिका साकारणारी गौरी अगरवाल म्हणते की, परिस्थितीने कीर्तीला बदलले. वेडसर उत्कट प्रेयसीची भूमिका करताना गौरीला 'ऐतराज' चित्रपटातील प्रियांका चोप्राच्या भूमिकेपासून प्रेरणा मिळाल्याचे तिने सांगितले.

# पाटणादेवी शाळेत 'निपुण भारत' अंतर्गत माता-पालक मेळावा

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि.७ जानेवारी :** तालुक्यातील बहिरगाव केंद्र अंतर्गत 'निपुण भारत' योजनेच्या माध्यमातून जिल्हा परिषद पाटणादेवी शाळेत दि. ५ रोजी माता-पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांची भूमिका अधिक सक्षम व्हावी, या उद्देशाने मेळाव्यात मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास निपुण भारत योजनेचे विभागीय समन्वयक नारायण हाकाळे, जिल्हा समन्वयक अजय इंगळे, प्रथम एज्युकेशन फाउंडेशनचे सदाशिव साबळे, 'ग्रंथालय आपल्या दारी' योजनेचे नरेश



सोनवणे व आकांक्षा श्रीकांत आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व मान्यवरांचे स्वागत शाळा प्रमुख योगेश पाटील, सहशिक्षिका स्वाती सोनवणे, बहिरगाव केंद्रप्रमुख अनिता जालनापुरकर तसेच उपस्थित माता-पालकांनी केले.

यावेळी पाटणादेवी शाळेच्या नवीन डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षिका स्वाती सोनवणे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी केंद्रप्रमुख अनिता जालनापुरकर, कलाशिक्षक सलीम आतार, दीपक सोनवणे तसेच केंद्रातील शिक्षक भाऊसाहेब सोननिस, रोहिणी पवार, भावना बागुल, वर्षा देसले यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास बहिरगाव केंद्रातील २१ शाळांमधील शिक्षिका प्रतिनिधी व प्रत्येक शाळेतील दोन लीडर माता उपस्थित होत्या.

# माळेगाव पिप्रीत 'रासेयो' श्रमसंस्कार शिबिर

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव,दि. ८ जानेवारी :** सोयगाव येथील संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा



योजना विभाग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन माळेगाव पिप्री येथे करण्यात आले.

दि. ७ ते १३ या कालावधीत संपन्न होणाऱ्या या शिबिराचे उद्घाटन सोयगाव पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक गजानन आरेकर यांच्या हस्ते बुधवारी रोजी माळेगाव पिप्री येथे करण्यात आले.त्यांनी स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजनेचे आणि शिबिरांचे आयुष्यातील महत्त्व समजून सांगितले.या कार्यक्रमाप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार हे अध्यक्षस्थानी होते. तसेच सदर कार्यक्रमासाठी सोयगाव तहसीलचे नायब तहसीलदार राहुल पत्रिके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ.निलेश गावडे यांनी केले तर सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ.पंकज गावित यांनी केले.

कार्यक्रमाधिकारी डॉ.सुनील चौधरे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, स्वयंसेविका, महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पंढरीनाथ शिसोदे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ वाद-विवाद स्पर्धा

**तभा.वृत्तसेवा**

**पैठण,दि.८ जानेवारी :** विवेकानंद शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर संचलित श्रीनाथ हायस्कूल, पैठण येथे संस्थेचे आद्य संस्थापक कै. पंढरीनाथ पाटील शिसोदे ऊर्फ 'भाऊ' यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य तालुकास्तरीय वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य शिवाजीराव पठाडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून तुषार शिसोदे पाटील (कोषाध्यक्ष, विवेकानंद शिक्षण संस्था), शिवराज भुमरे (सरपंच, पाचोड), प्रल्हाद औटे, देवीचंद मोरे, दत्तात्रय आमले उपस्थित होते. प्रमुख उपस्थिती म्हणून संतोष खराद मुख्याध्यापक, स्पर्धेचे परीक्षक भाऊसाहेब भापकर, श्रीमती आंधळे, पत्रकार रमेश शेळके हे होतेद्र प्रा. संतोष गव्हाणे, पवन खराद, शिवाजी जगताप, डॉ. प्राचार्य समाधान दांडगे, सिकंदर थोरात, अनिल काकडे पर्यवेक्षक मिडल विभाग एनसीसी विभाग प्रमुख रामनाथ कानडे सुनील चितळे श प्रवीण गोर्डे आदी मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले व कै. पंढरीनाथ पा शिसोदे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या स्पर्धेत प्रथम - सिद्धांत कृष्णा राजगुरू (चांगदेव विद्यालय, चांगतपुरी)' द्वितीय - तुषार दत्तात्रय भांड (आर्य चाणक्य विद्यामंदिर, पैठण), तृतीय - अंकिता शिवाजी गरड (श्रीनाथ हायस्कूल, पैठण), उत्तेजनार्थ - पायल कुंडलिक शेळके (श्रीनाथ हायस्कूल, पैठण), तर सांघिक ढाल चांगदेव विद्यालय, चांगतपुरीच्या सिद्धांत कृष्णा राजगुरू व सुखदेव खाडे यांनी संयुक्तरित्या पटकावली.

प्राचार्य श्री शिवाजीराव पठाडे यांनी अध्यक्षीय समारोप केला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीनाथ हायस्कूल परिवारातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले संतोष मडके यांनी आभार प्रदर्शन केले.

**जाहीर प्रगटन**

**मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर, जि.छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि. अर्ज क्र.२२/२०२६

अर्जदार : अशोक पि. भाउसाहेब देहडे, वय ५५ वर्ष, धंदा शेती रा. भालगाव, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरणः- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे करीता अर्ज.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ड. टी. व्ही. कोल्हे यांचे मार्फत न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदार हा वरील ठिकाणचा रहीवासी असुन अर्जदाराची आई नामे शालुबाई भ्र. भाउसाहेब देहडे रा. भालगाव ता. गंगापुर ही दिनांक १३/१२/२०१६ रोजी मौजे भालगाव, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाली असुन अर्जदाराचे वडील हे फार वर्षापुर्वी मयत झालेले आहे. मयत शालुबाई व भाउसाहेब यांचे अर्जदार हे एकमेव अपत्य आहे. अर्जदार हा मयत शालुबाई भ्र. भाउसाहेब देहडे याचा एकमेव वारस असुन या अर्जदारा व्यतीरीक्त मयत शालुबाई यांना इतरकुणीही वारस नाहीत. अर्जदारास शासकीय, निमशासकीय कामाकरीताअर्जदार हा मयत शालुबाई यांचे कायदेशिर वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप प्रमाणपत्र ) आवश्यकता आहे. त्याआर्थी तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, ज्या कुणासअर्जदाराने विनंती केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यास आक्षेप उजर असेल त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत तसा लेखी आक्षेप या मा. न्यायालयात दाखल करावा अन्यथ कायदयाप्रमाणे पुढील आदेश पारित करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन आज दिनांक ०८/०१/०२०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी प्रसिध्द केले.

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी तथा फौजदारी न्यायालय गंगापूर**

**जाहीर प्रगटन**

**मा.श्री.व्ही.डी. पाटिल साहेब दिवाणी न्यायाधीश, क स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात.**

दि.कि. अर्ज नं. ०७/२०२६
पुढील तारीख २७/०२/२०२६

अर्जदार : १- लताबाई भ्र. बुधा काटे वय ६० वर्षे, धंदा-घरकाम, रा. राजुर ता. बोधवड, जि. जळगाव, २- शोभाबाई भ्र. भागीरथ गोयत वय ५७ वर्षे धंदा घरकाम, रा. खामगाव ता- बदनापुर, जि- जालना. ३- प्रकाश चिंधु सारंग वय-५० वर्षे, धंदा-शेती, रा. अंधानेर, ता कन्नड जि. औरंगाबाद. ४. शैलाबाई भ्र. पुरालाल जाट (मयत), ४. अ-भूरालाल पि. भिकुसिंग जाट वय- ५३ वर्षे, धंदा-शेती, रा. मनुर, ता- बोधवड जि. जळगाव, ४. ब- सोनल भ्र. गजानन रहाड वय २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. मनुर, ता बोधवड जि.जळगाव, ४-क वैभव पि. भूरालाल जाट वय-२५ वर्षे, धंदा- नोकरी, रा.मनूर, ता बोधवड जि. जळगाव, ५- अलकाबाई भ्र. सुरेश जाखड वय- ४५ वर्ष, धंदा-घरकाम, रा. अंधानेर, ता कन्नड जि. औरंगाबाद.

गैरअर्जदारः निरंक

अर्जः अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत नामे चिंधु रामु सारंग यांचे कायदेशीर वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत, ज्याआर्थी अर्जदारांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.एम.एम. भारुका यांच्या मार्फत मा. न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील प्रमाणे कायमचे रहिवासी आहे. मयत नामे चिंधु रामु सारंग यांचे अर्जदार क्र. १ ते ५ मुले व मुली आहे. मयत नामे चिधु रामु सारंग यांना अर्जदार क्र.१ ते ५ व्यतिरीक्त कोणीही वारस नाहीत मयत चिंधु रामु सारंग हे दि. २६/०९/२००२ रोजी मयत झालेले आहे. तसेच त्यांचा अंत्यसंस्कार अंधानेर, ता. कन्नड येथे करण्यात आलेला आहे. मयत चिंधु रामु सारंग यांना अर्जदारांशिवाय कोणतेही कायदेशीर बारस नाहीत. मयत यांना मिळणारा शासकीय निमशासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच संबंधित तलाठी यांनी मयताच्या नावे असलेल्या स्थावर तसेच जंगम मिळकतीमध्ये बारसाची नोंद घेण्यासाठी मा. न्यायालयातून वारस प्रमाणपत्र आणायचे सांगितले त्यामुळे सदर अर्ज दाखल करण्यास कारण घडले. अर्जदार यांनी सदर अर्जाव्यतिरीक्त इतर कोणत्याही मा. न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला नाही. त्याआर्ची सदर जाहीर प्रगटन व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्या नुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आंत आपला उमेर, आक्षेप मा. न्यायालयात नोंदवावा मुदतीत उनेर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजर आक्षेप ग्राह धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

दिः ७/०१/२०२६ कनिष्ट लिपीक

**दिवाणी न्यायाधीश**
**आदेशावरुन**
**दिवाणि न्यायालय कन्नड**

## अग्रलेख...

# शिक्षकांना 'गुरुजी'च राहू द्या..!

महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेला सावित्रीबाई फुले, महात्मा जोतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी धोंडो केशव कर्वे आदी महनीयांचा वारसा आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे, असे मानणाऱ्या या भूमीत आज प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांची अवस्था मात्र केविलवाणी झाली आहे. ज्या हातांनी खडू धरून देशाची भावी पिढी घडवणे अपेक्षित आहे, त्याच हातांत सध्या 'कुत्रे मोजण्याची' नोंदवही दिली जात आहे. ही बाब दुर्दैवी तर आहेच, शिवाय शिक्षकांकडे पाहण्याच्या प्रशासकीय दृष्टिकोनाची दिवाळखोरी दर्शवणारी आहे. शिक्षकांना निवडणुकीची कामे देणे किंवा त्यांच्याकडून जनगणना करून घेणे हे कायद्याने अनिवार्य असले, तरी अलिकडच्या काळात शिक्षकांना स्वस्त व सहज उपलब्ध होणारे मनुष्यबळ समजण्याची चूक प्रशासन सातत्याने करीत असल्याचे दिसते. निवडणूक कामांच्या कर्तव्यापासून सुरू झालेला हा प्रवास आता गावात किती कुत्रे आहेत, किती शौचालये बांधली गेली आहेत आणि ती वापरली जातात की नाही, इथपर्यंत येऊन पोहोचला आहे, हे जास्त चिंताजनक आहे. शिक्षकांना सातत्याने अशैक्षणिक कामांत जुंपून आपण प्रगत महाराष्ट्र घडवू पाहत आहोत का, हा खरा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे आणि त्याचा ऊहापोह होणे गरजेचे आहे.

'आरटीई' कायद्यानुसार शिक्षकांना केवळ जनगणना, आपत्ती निवारण आणि निवडणूक या तीनच कामांसाठी नियुक्त करता येते. मात्र, प्रशासकीय यंत्रणा या नियमाला सतत हरताळ फासत आहे. पल्स पोलिओ मोहीम, वृक्षारोपण, स्वच्छ भारत अभियान, विविध शासकीय योजनांचे सर्वेक्षण, आधार कार्ड नोंदणी आणि आता तर गावोगावच्या जनावरांची मोजणीही शिक्षकांच्याच माथी मारली जात आहे. एखाद्या राष्ट्राची प्रगती ही त्या देशातील शाळेत असलेल्या बाकांवरच्या विद्यार्थ्यांवरून आणि शिक्षकांच्या गुणवत्तेवर ठरते. मात्र, आपल्याकडे शिक्षक वर्गात शिकवण्यापेक्षा शासनाच्या विविध पोर्टलवर माहिती भरणे, माध्यान्ह भोजन योजनेचा हिशेब ठेवणे आणि शालेय पोषण आहाराचा तांदूळ मोजण्यात जास्त व्यस्त आहेत. 'युनिसेफ'च्या एका अहवालानुसार, भारतातील प्राथमिक शिक्षक त्यांच्या एकूण वेळेपैकी सुमारे ३० ते ४० टक्के वेळ अशैक्षणिक कामांमध्ये घालवतात. महाराष्ट्रात तर हे प्रमाण अधिक भयावह असू शकते. जेव्हा एखादा शिक्षक गावात शौचालयाची मोजणी करायला जातो किंवा कुत्र्यांची गणना करतो, तेव्हा वर्गातील ५०-६० विद्यार्थ्यांचे भविष्य तो वाऱ्यावर सोडत असतो, हे आपण समजून घेतले पाहिजे. गुणवत्तेचा अभाव आणि ढासळलेली शैक्षणिक पातळी यासाठी पालकांचा रोष आधीच शिक्षकांवर आहे. शिक्षकांना उन्हाळ्याच्या सुट्या असतात, त्यांना पगार जास्त आहे, त्यांना कामच काय असते? अशा प्रकारची चर्चा मंत्रालयापासून ते गावाच्या चावडीपर्यंत रंगते. याच मानसिकतेतून त्यांना कुठलेही काम दिले तरी चालते, असा समज रूढ झाला आहे. यात काही अंशी वास्तव असले तरी, अशा काही अकार्यक्षम व कामचुकार शिक्षकांमुळे या 'नोबेल प्रोफेशन'चे पावित्र्य मलिन होत आहे. विद्यार्थ्यांविषयी तळमळ असलेले बरेच शिक्षकही प्रशासनाच्या अवास्तव विळख्यात अडकले आहेत, हेही लक्षात घेतले पाहिजे.

काही शिक्षक शिकवत नाहीत, हे खरे मानले तरी त्यांच्याकडून ती कामे करून घेण्याची जबाबदारी ही प्रशासकीय यंत्रणेचीच नव्हे का? अशा कामचुकार शिक्षकांवर कारवाई करण्याऐवजी, सरसकट साऱ्याच शिक्षकांना अधिक अशैक्षणिक कामांत गुंतवणे म्हणजे 'रोग रेड्याला आणि डाग पखाला' यासारखे नव्हे का? जे शिक्षक प्रामाणिकपणे, तळमळीने पिढी घडवू इच्छितात, त्यांची या यंत्रणेत मोठी कुचंबणा होत आहे. या अशैक्षणिक कामाच्या ओझ्याखाली त्यांचा उत्साह आणि सृजनशीलता मरत चालली आहे, हे कोण समजून घेणार? आज सरकारी शाळांसमोर खाजगी शाळांचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. इंग्रजी माध्यमांच्या अद्ययावत शाळांच्या आकर्षणापायी जिल्हा परिषदेच्या शाळांची पटसंख्या सातत्याने घटत आहे. अशा बिकट परिस्थितीत शिक्षकांची गुणवत्ता सुधारण्यावर भर देण्याऐवजी, त्यांना सरकारी योजनांच्या अंमलबजावणीचे 'एजंट' बनवले जात असेल, तर या राज्याच्या साक्षरतेचे प्रमाण मिझोरम व केरळसारखे कसे होईल, याचाही विचार केला पाहिजे. आपल्या राज्यात विद्यार्थ्यांची पटसंख्या टिकविण्यासाठी एकीकडे शिक्षकांना घरोघरी जाऊन मुलांची, त्यांच्या पालकांची मनधरणी करावी लागते. त्यात अशी अशैक्षणिक कामे आली की शिक्षकांचे लक्ष अध्यापनावरून उडणे स्वाभाविक आहे. एकीकडे शाळा वाचवायच्या आणि दुसरीकडे शिक्षकांना शाळेबाहेर काढायचे, हा निव्वळ विरोधाभास आणि विसंगती आहे. हे भविष्यात घातक ठरणार आहे.

राज्याच्या शिक्षण व्यवस्थेला या गर्तेतून बाहेर काढायचे असेल, तर कठोर निर्णयांची गरज आहे. शिक्षक हा राष्ट्राच्या जडणघडणीसाठी आवश्यक घटक असून, त्याच दृष्टिकोनातून त्याच्याकडे बघितले गेले पाहिजे. तो सर्वेक्षण यंत्रणा राबवणारा कारकून नाही. तो दिवसभर शिकवत नाही म्हणून त्याला दुसरी कामे देणे ही प्रशासनाची सोय झाली. उलट शिक्षकाला वाचन संस्कृती वाढवण्याची, विधायक कामे करून घेण्याची किंवा संशोधनाची कामे करण्यास प्रोत्साहित करणे जास्त गरजेचे आहे. मध्यंतरी सोलापूर जिल्ह्यातील परितेवाडीच्या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक रणजितसिंग डिसले यांनी तळमळीने घरोघरी जाऊन विद्यार्थ्यांना शाळेत आणले, नावीन्यपूर्ण शिक्षण पद्धत राबविली. त्यांच्या या कामासाठी युनेस्कोने २०२० मध्ये त्यांना जागतिक पातळीवर पुरस्कृतही केले. तेव्हा मिळालेल्या सात कोटी रुपयांतून त्यांनी अर्धी रक्कम अंतिम फेरीतील इतर देशांच्या स्पर्धकांना वाटून दिल्याने ते प्रकाशझोतात आले होते. पुढे प्रशासकीय यंत्रणेने त्यांची पार निराशा केली. जनगणना, पशुगणना किंवा शौचालयांची मोजणी करणे हे शिक्षकांचे काम नव्हे, त्यासाठी कंत्राटी पद्धतीने किंवा अन्य मार्गाने स्वतंत्र यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. या कामासाठी बेरोजगार तरुणांचा वापर केल्यास त्यांना रोजगारही मिळेल आणि शिक्षकांचा वेळ विद्यार्थ्यांचे भविष्य घडविण्यात सत्कारणी लागेल. ते तसे करीत नसतील तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई झाली पाहिजे. पण सरसकट साऱ्या शिक्षकांना अशा सर्वेक्षणांच्या कामात जुंपणे कसे न्याय्य ठरेल? उन्नत माहिती तंत्रज्ञानाच्या युगात 'सरल'सारखी पोर्टल्स अधिक सुटसुटीत करण्याचीही गरज आहे. माहिती भरण्यासाठी प्रत्येक शाळेत स्वतंत्र 'डेटा एन्ट्री ऑपरेटर'ची नियुक्ती होणेही आवश्यक आहे. जेणेकरून शिक्षकांना ही कारकुनी कामे करावी लागणार नाहीत. 'आरटीई' कायद्यानुसार दिलेल्या तीन अनिवार्य कामांव्यतिरिक्त शिक्षकांना कोणतेही चौथे काम दिले जाणार नाही, याची काळजी घेतली पाहिजे. अशा पद्धतीने अशैक्षणिक कामे पूर्णपणे बंद केल्यानंतरही जर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत सुधारणा झाली नाही, तर मात्र शिक्षकांना त्यांच्या शैक्षणिक कामांचा जाब प्रशासकीय यंत्रणांनी खुशाल विचारावा. नव्हे, कामचुकार शिक्षकांवर कारवाई करावी, आमचे काहीच म्हणणे नाही. शिक्षक हा समाजाचा कणा आहे, असे जर आपण मानतो तर हा कणा अशैक्षणिक कामांच्या ओझ्याखाली वाकायला नको. तो वाकला तर समाज कोसळायला वेळ लागणार नाही. कुत्रे आणि शौचालये मोजण्याचे काम कोणीही करू शकेल, पण विद्यार्थ्यांची मने घडवण्याचे आणि त्यांना सुसंस्कृत नागरिक बनवण्याचे काम केवळ शिक्षकच करू शकतात. सरकारी यंत्रणांनी याचे भान ठेवले पाहिजे, नव्हे या परिस्थितीचे गांभीर्य समजून घेतले पाहिजे. शिक्षकांना पुन्हा एकदा 'फळा आणि खडू' यांच्याशी नाते जोडू द्या, अन्यथा आपण केवळ सुशिक्षित बेरोजगार आणि गुणवत्ताहीन पिढी निर्माण करू. शिक्षकांना गुरुजीच राहू द्या, त्यांना सरकारी कारकून बनवू नका!

---


## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# भारताचे 'बाहुबली' यश

भारतीय अंतराळ संशोधन संस्था म्हणजेच 'इस्रो'ने पुन्हा एकदा जागतिक स्तरावर कर्तृत्वाचा झेंडा फडकावला. २४ डिसेंबर २०२५ रोजी श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून एलव्हीएम३-एम६ या भारताच्या सर्वांत शक्तिशाली रॉकेटचे यशस्वी प्रक्षेपण करण्यात आले. प्रचंड क्षमतेमुळे या रॉकेटला 'बाहुबली' असे टोपणनाव देण्यात आले आहे. हे केवळ एक रॉकेट प्रक्षेपण नव्हे, तर अंतराळ क्षेत्रातील भारताच्या वाढत्या व्यावसायिक ताकदीचे आणि 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेचे एक जिवंत प्रतीक आहे. या मोहिमेद्वारे अमेरिकेचा 'ब्लू बर्ड ब्लॉक-२' हा महाकाय उपग्रह अवकाशात स्थापित करण्यात आला असून त्याचा थेट परिणाम आगामी काळात आपल्या मोबाईल वापरावर होणार आहे. या प्रक्षेपणाचा सर्वांत मोठा आणि थेट फायदा सामान्य मोबाईल वापरकर्त्यांना मिळणार आहे. सध्या मोबाईलवर इंटरनेट वापरण्यासाठी आपण जमिनीवरील टॉवर्सवर अवलंबून असतो. मात्र, ब्लू बर्ड ब्लॉक-२ उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे 'डायरेक्ट-टू-स्मार्टफोन' ही नवी तंत्रज्ञान प्रणाली कार्यान्वित होणार आहे. यामुळे सामान्य ४ जी आणि ५ जी स्मार्टफोन्सना कोणत्याही विशेष उपकरणाशिवाय थेट अंतराळातून कनेक्टिव्हिटी मिळेल. यामुळे दुर्गम डोंगरदऱ्या, समुद्र किंवा मोबाईल टॉवर्स लावणे अशक्य असणाऱ्या ठिकाणीही आता हाय-स्पीड ब्रॉडबॅण्ड इंटरनेट उपलब्ध होईल. व्हॉईस कॉल, व्हिडीओ कॉल आणि डेटा स्ट्रीमिंग या सेवांमध्ये कोणताही खंड पडणार नाही. विशेषतः नैसर्गिक आपत्तीच्या काळात जमिनीवरील नेटवर्क ठप्प झाले असता ही सॅटेलाईट आधारित यंत्रणा विशेष महत्त्वाची ठरेल. यामुळे जगातील 'डिजिटल दरी' कमी होण्यास मदत होईल आणि ग्रामीण भागातील नागरिकही जागतिक माहिती तंत्रज्ञानाशी जोडले जातील.

एलव्हीएम ३-एम ६ ने अवकाशात सोडलेला ब्लू बर्ड ब्लॉक-२ हा उपग्रह एका फिरत्या 'मोबाईल टॉवर'सारखा काम करतो. सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे याचा २२३ चौरस मीटरचा विशाल अँटेना. इतका मोठा असल्यामुळेच तो पृथ्वीपासून ५०० ते ६०० किलोमीटर उंचीवरून तुमच्या खिशातील लहानशा मोबाईलमधील कमकुवत सिग्नल पकडून प्रतिसाद देऊ शकतो. पारंपरिक सॅटेलाईट इंटरनेटसाठी (उदा. स्टारलिंक) घराच्या छतावर एक विशेष 'डिश' लावावी लागते. परंतु या तंत्रज्ञानात उपग्रह थेट फोनमधील एलटीई (४जी) किंवा ५जी लहरींशी संवाद साधतो. या मोहिमेचा सर्वांत मोठा आणि थेट फायदा व्होडाफोन आयडिया (व्हीआय) च्या वापरकर्त्यांना मिळण्याची शक्यता आहे. कारण 'एसटी स्पेसमोबाईल' (याचा उपग्रह ब्लू बर्ड ब्लॉक-२ इस्रोने सोडला आहे) या कंपनीने भारतात 'व्होडाफोन आयडिया'शी धोरणात्मक भागीदारी केली आहे. या करारानुसार, दुर्गम भागात कंपनीचे टॉवर्स पोहोचू शकत नसल्यास हा उपग्रह 'व्हर्च्युअल टॉवर' म्हणून काम करेल. त्यामुळे व्हीआय वापरकर्ते आपल्या सध्याच्या ४ जी किंवा ५ जी फोनवरून थेट उपग्रहाशी कनेक्ट होऊ शकतील. सरकारी कंपनी 'बीएसएनएल'ने 'व्हीआयएएसएटी' या अमेरिकन कंपनीशी हातमिळवणी केली आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये त्यांनी 'डायरेक्ट-टू-डिवाईस' तंत्रज्ञानाची यशस्वी चाचणी केली होती.



बीएसएनएल विशेषतः आपत्कालीन सेवा, लष्करी गरजा आणि अतिदुर्गम भागातील नागरिकांसाठी सॅटेलाईट मेसेजेस आणि कॉल सेवा सुरू करण्यावर भर देत आहे. रिलायन्स जिओ आणि भारती एअरटेल सध्या 'स्टारलिंक' आणि 'वनवेब' यासारख्या सेवांशी स्पर्धा किंवा सहकार्य करण्याच्या तयारीत आहेत. मात्र या सेवा सुरुवातीला 'फिक्स्ड वायरलेस ॲक्सेस' (घराच्या छतावर डिश लावून मिळणारे इंटरनेट) यावर केंद्रित असू शकतात. तरीही, भविष्यात 'एअरटेल' आणि 'जिओ'देखील वापरकर्त्यांना थेट स्मार्टफोन जोडणी देण्यासाठी स्वतःचे किंवा भागीदारीतील सॅटेलाईट नेटवर्क वापरू शकतात. अर्थात ही सेवा वापरण्यासाठी काही गोष्टींची माहिती असणे आवश्यक आहे. जसे की, फोन गेल्या दोन-तीन वर्षांमधील ४ जी किंवा ५ जी असेल तर या उपग्रहाशी जोडला जाऊ शकेल. अगदी स्वस्त ५ जी फोन्समध्येही हे तंत्रज्ञान काम करेल. नजीकच्या भविष्यात फोनच्या 'नेटवर्क सेटिंग्स'मध्ये 'सॅटेलाईट रोमिंग' असा पर्याय दिसू शकेल. तो सुरू केल्यानंतर तुम्ही टॉवरच्या कक्षेबाहेर गेल्यावरही फोन सुरू राहील. ही सेवा प्रामुख्याने समुद्रात मासेमारीसाठी जाणारे कोळी, हिमालयात जाणारे ट्रेकर्स, जंगलातील रिसॉर्ट्स आणि राष्ट्रीय महामार्गावरील सिग्नल नसणाऱ्या जागांवरून प्रवास करणाऱ्या लोकांसाठी वरदान ठरेल. या तंत्रज्ञानाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे वापरकर्त्याला काहीही नवीन खरेदी करण्याची गरज नाही. म्हणजेच सॅटेलाईट फोन किंवा 'स्टारलिंक'सारख्या छतावर बसवण्याच्या अँटेनाची गरज भासणार नाही. सध्याचा ४जी/५जी एलटीई तंत्रज्ञान असणारा स्मार्टफोनच उपग्रहाशी जोडला जाईल.

या तंत्रज्ञानामुळे मोबाईल टॉवरची रेंज नसणाऱ्या ठिकाणी तुमचा फोन आपोआप उपलब्ध उपग्रह सिग्नल शोधेल. हे तंत्रज्ञान 'रोमिंग'प्रमाणेच काम करेल. या सेवेअंतर्गत सुरुवातीच्या टप्प्यात वापरकर्ते आपत्कालीन एसएमएस, साधे मेसेज आणि व्हॉईस कॉल करू शकतील. त्यानंतरच्या टप्प्यात हाय-स्पीड इंटरनेट आणि व्हिडीओ स्ट्रीमिंगची सुविधा उपलब्ध होईल. लवकरच टेलिकॉम कंपन्या ग्राहकांसाठी 'सॅटेलाईट ऑन डिमांड प्लॅन्स' आणू शकतात. उदाहरणार्थ, तुम्ही हिमालयात ट्रेकिंगला जाणार असाल तर काही दिवसांसाठी सॅटेलाईट कनेक्टिव्हिटीचा पॅक घेऊ शकाल. या नव्या सेवेचे अनेक लाभ मिळतील. जसे की, या प्रक्षेपणामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात हाय-स्पीड इंटरनेट पोहोचेल. शिक्षण आणि आरोग्यासाठी त्याचा फायदा होईल.

आजही ग्रामीण भागातील दुकानांमध्ये नेटवर्क नसल्यास यूपीआय व्यवहार फेल होतात. मात्र 'बाहुबली' उपग्रहामुळे मिळणाऱ्या स्थिर नेटवर्कमुळे अगदी दुर्गम भागातील किराणा दुकानातही डिजिटल पेमेंट सहज शक्य होईल. फळे, भाजीपाला किंवा औषधे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेताना ट्रकच्या ट्रॅकिंगसाठी नेटवर्क आवश्यक असते. मात्र महामार्गावरील 'ब्लॅक स्पॉट' (नेटवर्क नसलेल्या जागा) मुळे यात अडचण येते. आता ही अडचणही सुटणार असून रिअल-टाईम ट्रॅकिंग शक्य होईल. सध्या खेड्यापाड्यातील बरीच मुले युट्यूब किंवा इतर शैक्षणिक ॲप्सवरून अभ्यास करतात. पण पावसाळ्यात किंवा खराब हवामानात फायबर तुटल्यास यात खंड पडतो. सॅटेलाईट इंटरनेटमुळे ही अडचणही दूर होणार आहे. खेरीज पावसाचा अचूक अंदाज थेट मोबाईलवर मिळाल्यामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान टाळता येईल. थोडक्यात, 'बाहुबली' रॉकेटची ही झेप भारताच्या कानाकोपऱ्यातील शेवटच्या माणसाला 'डिजिटल इंडिया'चा खरा भाग बनवणार आहे. इस्रोचे हे 'बाहुबली' प्रक्षेपण भारताला 'सॅटेलाईट-टू-स्मार्टफोन' क्रांतीच्या शर्यतीत जगातील आघाडीच्या देशांच्या रांगेत उभे करत आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वेध

**विजय कुळकर्णी**

# ग्राम पंचायती होताहेत समृद्ध

राज्यातील ग्राम पंचायतींची संख्या खूप मोठी आहे. गावातील विकासकामे ग्राम पंचायतींमार्फतच करण्याचा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. हा निर्णय घेतल्यापासून गावातील अंतर्गत रस्ते, नळ योजना, ग्राम स्वच्छता, दिवाबत्ती इत्यादी कामे त्या त्या ग्राम पंचायतींमार्फत करण्याची अंमलबजावणी देखील सुरू आहे. मात्र, ही कामे करताना ग्राम पंचायतींना सर्वांत मोठी अडचण होती ती स्वनिधीची. कारण, ग्रामीण भागातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती आहे. निसर्गाने साथ दिली तर, त्या वर्षी कृषी उत्पादन चांगले होते आणि पूर, दुष्काळ इत्यादी नैसर्गिक संकटे कोसळल्यास गावकऱ्यांची आर्थिक घडी विस्कटते. त्यामुळे घरपट्टी, पाणीपट्टी भरण्यासाठी त्यांच्याकडे पैसेच राहत नाहीत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांकडे मालमत्ता व पाणीपट्टीची थकबाकी मोठ्या प्रमाणात थकित राहत होती. परिणामी ग्राम पंचायतींकडे स्वनिधी नसल्याने अनेक लहानसहान बाबींसाठी ग्राम पंचायती शासनावर अवलंबून राहत होत्या. यावर उपाय म्हणून महाराष्ट्र शासनाने राज्यभरातील ग्राम पंचायतींसाठी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हाती घेतले. या अभियानांतर्गत मालमत्ताधारकांना त्यांच्याकडील कर भरण्यासाठी ५० टक्के सूट दिली. त्याला ग्रामीण भागातील जनतेने प्रचंड प्रतिसाद दिला. त्यामुळे ग्राम पंचायतींकडे मालमत्ता करांच्या माध्यमातून मोठा निधी संकलित झाला आहे.




३१ डिसेंबर २०२५ ही कर सवलत मिळण्यासाठी शेवटची तारीख देण्यात आली होती. त्यामुळे डिसेंबर २०२५ मध्ये ग्रामीण भागातील मालमत्ताधारकांनी ग्राम पंचायतींसमोर अक्षरशः रांगा लावून मालमत्ता कर भरला. बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर ग्रामीण ग्राम पंचायतीमध्ये या योजनेंतर्गत ६० ते ७० लाखांचा निधी करस्वरूपात जमा झाला. सिंदखेडराजा तालुक्यातील शेंदुर्जन येथील ग्राम पंचायतीत कर भरण्यासाठी लोकांनी प्रचंड प्रतिसाद दिला. रांगा लावून लोकांनी त्यांच्याकडील थकित कर भरला. संग्रामपूर तालुक्यात योजनेची मुदत वाढवून देण्याची मागणी मालमत्ताधारकांनी केली होती. त्यानंतर योजनेला मुदतवाढ मिळाल्यामुळे मोठ्या प्रमाणात विविध ग्राम पंचायतीत कर संकलन होत आहे. यापूर्वी ग्रामीण भागातील सर्व विकास कामे जिल्हा परिषदेमार्फत केली जात होती. जलस्वराज्यच्या माध्यमातून १० टक्के लोकवर्गणी भरून पिण्याच्या पाण्याची योजना शासनामार्फत दिली जात होती. अजूनही काही योजनांसाठी १० टक्के लोकवर्गणीची अट कायम आहे. मात्र, त्यासाठी ग्राम पंचायतींचा कर मालमत्ताधारकांकडे थकित असल्यामुळे लोकवर्गणी भरणे ग्राम पंचायतींना शक्य होत नव्हते. त्याबरोबर इतर विकासकामे जसे की, प्लेव्हरब्लॉक बसविणे, हायमास्ट लाईट उभारणे, पथदिवे लावणे, घंटागाडी खरेदी करणे इत्यादी बाबींसाठी आमदार, खासदारांचा निधी किंवा जिल्हा परिषदेकडून ग्राम पंचायतींना निधी मागावा लागत होता.

आता ग्राम पंचायतींना मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत कर स्वरूपात मोठ्या प्रमाणात निधी मिळत आहे. याचा विनियोग गावाच्या विकासासाठी केला जाणार आहे. एखाद्या गावात सांडपाण्याची समस्या निकाली काढण्यासाठी नाली बांधण्याची गरज आहे. त्यासाठी जिल्हा परिषद अथवा शासनाची परवानगी घेण्याची गरज आता नाही. ग्राम पंचायतीनेच कृती आराखडा तयार करून तो मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठवून त्याला मंजुरी मिळाल्यावर ग्राम पंचायतच ते काम करू शकते. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज योजनेच्या माध्यमातून ग्राम पंचायतींकडे आता स्वतःचा निधी संकलित होणार आहे. त्याचा विनियोग गावाच्या विकासकामांवरच झाला पाहिजे. त्या कामात पारदर्शकता असणे अपेक्षित आहे. गावातील अंतर्गत रस्त्यांची डागडुजी, नळ योजनेची देखभाल व दुरुस्ती इत्यादी कामे करताना त्यात भ्रष्टाचार होऊ नये, अशी सर्वांचीच अपेक्षा आहे. या कर संकलनातून ग्राम पंचायतमधील कर्मचाऱ्यांचे वेतन, संगणक, इंटरनेट इत्यादी अद्ययावत सुविधा उपलब्ध करून देणे, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, व्यायामशाळा सुरू केली पाहिजे. जनतेकडून मिळालेला पैसा जनतेच्याच उपयोगी खर्च व्हावा, अशी रास्त अपेक्षा ग्राम पंचायतींकडून आहे. राज्यातील सर्व सरपंच व त्यांचे सहकारी ही अपेक्षा पूर्ण करतील, असा विश्वास आहे.

८८०६००६१४९

---

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# देशात अविरोध निवडणुकीची परंपरा

महाराष्ट्रातील महानगरपालिका निवडणुकीत ६८ नगरसेवक अविरोध निवडून आल्यामुळे वादळ उठले आहे. अविरोध निवडून आलेले जवळपास सर्वच सदस्य भाजपा आणि शिवसेनेचे असल्यामुळे निवडीच्या पद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. त्यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला जात आहे. या मुद्यावरून राजकीय वातावरणही तापवण्याचा प्रयत्न केला जात आहे. पण यावेळी प्रथमच एखाद्या निवडणुकीत उमेदवार अविरोध निवडून आले का, याआधी असे कधी झाले नव्हते का, असा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. विधानसभा आणि लोकसभेपासून देशात आतापर्यंत झालेल्या अनेक निवडणुकांमध्ये काही उमेदवार अविरोध विजयी झाले आहेत. विशेष म्हणजे फक्त भाजपाचेच उमेदवार अविरोध विजयी झाले, अन्य पक्षांचे नाही, असेही कधी झाले नाही. अनेक निवडणुकांत काँग्रेस, सपा, नॅशनल कॉन्फरन्स यांचेही उमेदवार अविरोध निवडून आले आहेत. महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री आणि देशाचे संरक्षण मंत्री यशवंतराव चव्हाण यांच्यासह डॉ. फारुक अब्दुल्ला आदी नेते लोकसभेवर अविरोध निवडून आले आहेत. विधान परिषद आणि राज्यसभेच्या बहुतांश निवडणुका तर अविरोधच होत असतात, मग यावेळीच अविरोध निवडणुकीवरून गदारोळ का केला जात आहे?

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत गुजरातच्या सुरत लोकसभा मतदारसंघातून भाजपाचे मुकेश दलाल अविरोध विजयी झाले होते. यावेळी काँग्रेस उमेदवार नीलेश कुंभानी यांचा अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी फेटाळून लावला. गंमत म्हणजे काँग्रेसचे डमी उमेदवार सुरेश पडसाला यांचा अर्जही फेटाळला गेला. त्यानंतर रिंगणातील अन्य ८ उमेदवारांनी माघार घेतली. त्यावेळीही दलाल यांच्या अविरोध निवडीवर काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला होता. त्याआधी २०१२ मध्ये उत्तरप्रदेशच्या कन्नौज लोकसभा मतदारसंघातून समाजवादी पक्षाच्या डिम्पल यादव अविरोध निवडून आल्या होत्या. खासदार असलेल्या अखिलेश यादव यांची उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून निवड झाल्यानंतर त्यांनी कन्नौजच्या खासदारकीचा राजीनामा दिला आणि ते विधान परिषदेत गेले. सपाने या मतदारसंघात डिम्पल यादव यांना उमेदवारी दिली. काँग्रेस आणि बसपाने या मतदारसंघात उमेदवारी अर्जच भरला नाही, भाजपाचा उमेदवारही अर्ज दाखल करू शकला नाही. अन्य दोन उमेदवारांनी माघार घेतल्यामुळे डिम्पल यादव यांची अविरोध निवड झाली. मुळात एखादा उमेदवार अविरोध तेव्हाच निवडून येतो, जेव्हा त्याच्याविरुद्ध रिंगणात एकही उमेदवार नसतो. अनेक वेळा काही उमेदवारांचे अर्ज तांत्रिक कारणाने म्हणजे पुरेशी कागदपत्रे न जोडल्यामुळे रद्द होतात, तर काही वेळेला उमेदवार स्वतःच निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेतात. त्यामुळे रिंगणात असलेल्या एकमेव उमेदवाराला अविरोध विजयी घोषित केले जाते.

पहिली सार्वत्रिक निवडणूक १९५१ ला झाली. यात दहा उमेदवार अविरोध निवडून आले होते. निवडून आलेले सर्वच उमेदवार काँग्रेसचे होते. १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत ११ उमेदवार अविरोध विजयी झाले. १९६२ च्या निवडणुकीत तीन तर १९६७ च्या निवडणुकीत पाच उमेदवार अविरोध निवडून आले. १९७१ च्या एक तर १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत दोन उमेदवार अविरोध विजयी घोषित करण्यात आले. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीतही एकमेव उमेदवार अविरोध निवडून आला होता.

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री असलेले यशवंतराव चव्हाण नाशिक लोकसभा मतदारसंघात १९६३ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीत अविरोध विजयी झाले होते. चीनच्या आक्रमणानंतर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावले आणि त्यांना संरक्षण मंत्री केले. महाराष्ट्राचा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावला, असे या घटनेचे वर्णन तेव्हा करण्यात आले होते. चीनसोबतचे युद्ध संपल्यानंतर चव्हाण यांना लोकसभेत निवडून आणण्याचे ठरले. नाशिक लोकसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत चव्हाणांबद्दलचा आदर आणि कृतज्ञता म्हणून त्यांच्याविरुद्ध उमेदवार उभा न करण्याचा निर्णय सर्व राजकीय पक्षांनी घेतला. परिणामी चव्हाण अविरोध विजयी झाले. माजी अर्थमंत्री टी. टी. कृष्णमाचारी १९६२ च्या लोकसभा निवडणुकीत तामिळनाडूच्या तिरुचेंदूर मतदारसंघातून विजयी झाले होते. जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री डॉ. फारुक अब्दुल्ला, ओडिशाचे तत्कालीन मुख्यमंत्री हरेकृष्ण मेहताब, लक्षद्वीपचे पी. एम. सईद तसेच नागालॅण्डचे माजी मुख्यमंत्री एस. सी. जमीर सुद्धा अविरोध निवडून आले होते. देशाच्या पहिल्या निवडणुकीपासून २०२४ च्या लोकसभा निवडणुकीपर्यंत तीन डझनावर अविरोध विजयी झाले आहेत.

नीलम संजीव रेड्डी हे देशातील पहिले आणि एकमेव राष्ट्रपती होते, जे अविरोध निवडून आले होते. जनता पक्षाच्या कार्यकाळात रेड्डी राष्ट्रपतिपदी विजयी झाले. २५ जुलै १९७७ ते २५ जुलै १९८२ असा त्यांचा राष्ट्रपतिपदाचा कार्यकाळ होता. काँग्रेससह अन्य सर्व विरोधी पक्षांनी रेड्डी यांच्या उमेदवारीला पाठिंबा दिला होता. देशात उपराष्ट्रपतिपदासाठी १६ वेळा निवडणूक झाली, पण त्यातील फक्त चार निवडणुका अविरोध झाल्या. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् दोन्ही वेळेला उपराष्ट्रपतिपदी अविरोध निवडून आले. पहिल्यांदा १९५२ ला आणि नंतर १९५७ ला. मोहम्मद हिदायतुल्ला १९७९ मध्ये उपराष्ट्रपतिपदी अविरोध निवडून आले. त्यानंतर असे भाग्य डॉ. शंकरदयाल शर्मा यांना १९८७ मध्ये लाभले. ऑगस्ट २०२४ मध्ये राज्यसभेच्या १२ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत सर्व म्हणजे १२ उमेदवार अविरोध विजयी झाले. यात भाजपाच्या ९, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रीय लोक मोर्चाच्या प्रत्येकी एका उमेदवाराचा समावेश होता. त्याआधी फेब्रुवारी २०२४ मध्ये राज्यसभेच्या ४१ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, काँग्रेसच्या सोनिया गांधी, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव अविरोध निवडून आले होते.

सामान्यपणे निवडणूक जितकी वरच्या पदाची असेल त्यात अविरोध निवडीची शक्यता जास्त असते. खालच्या पदावरील निवडणुकीत दावेदार खूप असल्यामुळे चुरस असते. २०२४ मध्ये पंजाबमध्ये सरपंचाच्या १३ हजार पदांसाठी निवडणूक झाली, त्यातील ३ हजार सरपंच अविरोध निवडून आले. एवढ्या मोठ्या संख्येत सरपंच अविरोध निवडून आल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने तेव्हा आश्चर्य व्यक्त केले. तसेच असंतुष्ट उमेदवारांना निवडणूक आयोगासमोर याचिका दाखल करण्याची अनुमती दिली. आयोगाने सहा महिन्यांत यावर निर्णय घेण्याचा निर्देशही न्यायालयाने दिला होता. या याचिकांचे पुढे काय झाले, ते मात्र समजू शकले नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील महानगर पालिका निवडणुकीत अविरोध विजयी झालेल्यांवरून वाद निर्माण करणे योग्य नाही. अविरोध निवडीचा फायदा कमी-जास्त प्रमाणात देशातील सर्वच राजकीय पक्षांना वेळोवेळी मिळाला आहे, हे विसरता येणार नाही. धनाचे आमिष दाखवून वा धमक्या देऊन कोणाला निवडणुकीच्या रिंगणातून माघार घेण्यास भाग पाडले जाऊ नये, तो स्वेच्छेने माघार घेत असेल त्यात गैर आणि बेकायदेशीर काही नाही.

९८८१७१७८१७

---

### मराठी ज्ञानभाषा होण्यासाठी संस्कृत भाषेचा आधार आवश्यक

''भाबडे भाषक ज्ञान'' हा अग्रलेख वाचला. इंग्रजी शब्दकोश छापणारे विश्वात बोलल्या जाणाऱ्या प्रभावी भाषेतील शब्द उधार घेतात हे खरे आहे. कारण इंग्रजी भाषेत नवीन शब्द निर्मिती शक्य होत नाही. पूर्वी लॅटिन व ग्रीक या प्राचीन भाषा युरोपीय भाषांना शब्दांच्या निर्मितीत साहाय्य करावयाच्या. त्यांची क्षमता संपल्याने इंग्रजी भाषेला अन्य भाषांचा आधार घेणे भाग आहे.

भारतीय भाषांवर ती वेळ येण्याचे कारण नाही. कारण भारतीय भाषांची जननी संस्कृत अजून जिवंत आहे. तिच्या शब्द निर्माण सामर्थ्यावर स्वतंत्र लेखन करता येईल. केवळ उदाहरण म्हणून आकाशवाणी व दूरदर्शनवरील बातम्या पाहू. जो बातम्या वाचतो त्याला एक वा दोन तासांपूर्वी हिंदी अथवा इंग्रजी भाषेत बातम्या लिहून दिल्या जातात. त्यांचे त्वरित भाषांतर करून त्या बातम्या वाचायच्या असतात. वेळ अत्यल्प असतो. आधुनिक शब्दावली हिंदीत लिहिली नसते. ते सरळ देवनागरी लिपीत इंग्रजी शब्द लिहितात व वाचतात. संस्कृत भाषेत असे करणे शक्य नाही. म्हणून ते नवीन शब्द तयार करतात. येथे संस्कृतच्या शब्द निर्मिती सामर्थ्याचा प्रत्यय येतो.

भारतीय भाषा संस्कृतोद्भव असल्याने संस्कृतचे नवीन शब्द स्वीकारले जाऊ शकतात आणि तसे झाले देखील आहे. उदाहरणार्थ - मराठीत अपार्टमेंटला सहनिवास, फ्लॅटला सदनिका हे संस्कृत शब्द रूढ झाले आहेत. मग आईचे दूध उपलब्ध असताना अन्य महिलेच्या दुधाकडे धाव कशाला? की येथेही परकीयांच्या अनुकरणात फुशारकी वाटते? जर परकीय भाषेचा शब्द वापरला तर त्याचे लिंग व वचन कोण ठरविणार? उदाहरणार्थ - कॉम्प्युटर चालवला म्हणावयाचे की चालवली अथवा चालवले. एकवचनात कॉम्प्युटर म्हटले तर बहुवचनात काय म्हणावयाचे? अशा लिंग वचन निर्धारित नसलेल्या विदेशी शब्दांची संख्या वाढली तर भाषेचे काय होईल? मानक भाषा राहील का? की सगळ्यांना धुडगूस घालावयाची अनुमती? अशा मिश्रित भाषेत व्यवहार करणारी आगामी पिढी मराठीत अवतरलेले मौलिक साहित्य समजू शकेल का? की जसे ज्ञानेश्वरी वाचताना अनुवादाचे साहाय्य घ्यावे लागते तसे घेणार?

संस्कृत भाषा केव्हा निर्माण झाली हे कोणालाच माहिती नाही. वेद संस्कृत भाषेत आहेत. पण ते कोणीही रचले नाहीत अशी धारणा आहे. म्हणून त्यांना अपौरुषेय म्हणतात. मनुष्याने रचलेले महाकाव्य आहे रामायण. ते आजही वाचले जाते. ज्याला संस्कृत भाषा येते त्याला अर्थ कळतो. भारतीय कालगणनेप्रमाणे रामायण त्रेतायुगात रचले गेले. श्रुती परंपरेने ते आपल्यापर्यंत पोहोचले. जर संस्कृत भाषेत काळाच्या ओघात परकीय वा प्राकृत शब्दांचे मिश्रण झाले असते तर आज संस्कृत जाणणाऱ्यांना रामायण वा महाभारत कळले असते का? सध्या जी शास्त्रे केवळ इंग्रजी माध्यमातून शिकवली जातात ती पुढे भारतीय भाषांमध्ये शिकविण्याची व्यवस्था करू, असे आश्वासन नवीन शिक्षण धोरणात दिले गेले आहे. त्या-त्या शास्त्रांच्या पाठ्यपुस्तकांचा व संदर्भ ग्रंथांचा अनुवाद मराठीत केला तर इंग्रजी भाषेची भीती असणाऱ्यांना वा गंध नसलेल्यांना तोच विषय मराठीतून शिकायला मिळेल. परिणाम - विषय अधिक चांगला समजेल व त्याचा व्यवहारात उपयोग होईल. हे करताना पारिभाषिक शब्दांची अडचण आहे. ही समस्या आपण देखील मांडली आहे. प्रत्येक भाषेत भिन्न पारिभाषिक शब्द उत्पन्न केले गेले तर केवळ त्या त्या भाषेचे जाणकार परस्पर वैचारिक देवाणघेवाण करू शकतील. अन्यथा पुन्हा इंग्रजीला शरण जावे लागेल. एका उदाहरणाने विषय स्पष्ट होईल. मराठीत ऑक्सिजनला प्राणवायू म्हणतात. शेजारील कर्नाटकात आम्लजनक म्हणतात. दोन्ही शब्द संस्कृत भाषेत तयार केले आहेत. पण अर्थ समजणार कसा? अशा समस्यांशी दोन हात करण्याची वेळ येऊ नये म्हणून पहिले संस्कृत भाषेत प्रत्येक शास्त्राचा पारिभाषिक शब्दांचा कोश असावा. तेच शब्द सर्व भारतीय भाषेत वापरले जावेत.

हे काम पंडित नेहरूंच्या काळात सुरू झाले. कोश तयार केले गेलेत. पण त्यांचा वापर कमी झाला. कोशांना अद्ययावत करण्याकडे कोणाचे लक्ष नाही. केवळ हे काम शिवाजी महाराज व सावरकरांनीच का बरे करावे? त्यांचा वारसा सांगणाऱ्यांनी का बरे करू नये? तात्पर्य काय? मराठीला ज्ञानभाषा करण्यासाठी संस्कृत भाषेचा आधार घेणे आवश्यक आहे, इंग्रजीचा नाही. संस्कृत भाषा ज्ञानभाषा आहे. त्यातील शास्त्रीय ग्रंथ मराठीत आणावेत. जगातील सगळ्या भाषांमधील ज्ञान मराठीत आणावे. पण ते आणताना मराठीच भ्रष्ट झाली तर चालेल?

**श्रीश देवपुजारी**/नागपूर

shreeshdeopujari@gmail.com

## वाचक पत्रे

### लबाडी आखूड चादरीसारखी

आजच्या समाज जीवनात जी व्यक्ती प्रामाणिक आहे, जी प्रामाणिकपणे आपले समाज व समाजबांधवांप्रतिचे कार्य अत्यंत अगदी मनापासून करत असते ती व्यक्ती समाजातील बऱ्याच लोकांना कळत नसते.

मात्र जी व्यक्ती खोटे बोलते, अनेकांना आपल्या लबाडीने फसवते, समाजातील अनेक व्यक्तींना आपल्या लबाडपणाच्या मधुर शब्दांनी गोल-गोल फिरविते अशी व्यक्ती आज समाजाला प्रिय असते. परंतु सत्य हे कटू असते, ते कधीही पराजित होत नसते, हे समाजातील नागरिकांना कालांतराने पटल्याशिवाय राहत नाही. आपली प्रतिमा लोकप्रिय व प्रसिद्ध होण्यासाठी कधीही लबाडी करू नये, कारण ती कालांतराने उघड होते व लबाडी करणाऱ्यांची काहीच किंमत राहत नाही. लबाडी ही आखूड चादरीसारखी आहे, ती तोंडावर घेतली तर पाय उघडे पडतात व पायावर घेतली तर तोंड उघडे पडते.

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४३१३१२२४४

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### दर्पण दिनानिमित्त वरपूडकर महाविद्यालयात पत्रकारांचा सन्मान

**सोनपेठ / प्रतिनिधी -** येथील कै. रमेश वरपूडकर महाविद्यालयाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने दर्पण दिनानिमित्त तालुक्यातील पत्रकार बांधवांचा समाज सोहळा आयोजित करण्यात आला होता.

बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेत वृत्तपत्र सुरू करून समाजजागृतीचे मोठे कार्य केले. त्यांना मराठी वृत्तपत्रांचे जनक मानले जाते. महाराष्ट्रात दर्पण दिन हा पत्रकार दिन म्हणूनही ओळखला जातो असे मत अध्यक्षीय समोर प्रसंगी प्राचार्य वसंत सातपुते यांनी व्यक्त केले.

दर्पण दिनानिमित्त सोनपेठ येथे पत्रकारांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे कोषाध्यक्ष श्री रामेश्वर कदम हे होते. तर प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. वसंत सातपुते व समन्वयक डॉ. मुकुंदराज पाटील हे होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे सर्वप्रथम पूजन करण्यात आले. त्यानंतर सन्मानमूर्ती सर्व पत्रकार बांधव यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमासाठी पत्रकार शिवमल्हार वाघे, गणेश पाटील, गजानन चिकणे, भागवत पोपडे, सिद्धेश्वर गिरी, आशिष मुंढे, बाबासाहेब गर्जे, सोमनाथ नागुरे, महादेव नरवटे, सुभाष सावंत, कल्याण वाघमारे, किरण स्वामी, प्रशांत बिराजदार, गणेश नाईक आदी पत्रकार बांधवांची उपस्थिती होती. यावेळी पत्रकार शिवमल्हार वाघे , गणेश पाटील यांनी पत्रकाराची भूमिका व पत्रकारितेचे समाजातील महत्त्व समजावून देत सत्काराला उत्तर दिले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ वसंत सातपुते यांनी पत्रकारांच्या सकारात्मक भूमिकेचे कौतुक करत महाविद्यालयाच्या कार्यक्रम व उपक्रमांना वेळोवेळी यथोचित प्रसिद्धी दिल्याबद्दल सर्व पत्रकार बांधवांचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. मुक्ता सोमवंशी यांनी केले. तर आभार प्रा.डॉ. विठ्ठल जायभाये यांनी मानले.

### महानगरपालिका निवडणुकीसाठी 'वोट फॉर परभणी' मतदार जनजागृती उपक्रम

**परभणी / प्रतिनिधी -** महापालिका निवडणूकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असून, मतदारांनी मोठ्या संख्येने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, यासाठी महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने 'वोट फॉर परभणी' हा विशेष मतदार जनजागृती उपक्रम राबविण्यात येणार आहे. हा उपक्रम १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ यांच्या जयंती व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती अर्थात युवक दिनानिमित्त आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमांतर्गत शहरातून भव्य 'वॉक फॉर वोट' काढण्यात येणार असून, यामध्ये शालेय विद्यार्थी, नागरिक, अधिकारी व कर्मचारी उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत. वॉक फॉर वोटमध्ये सहभागी होणारे विद्यार्थी आपापल्या शाळेच्या गणवेशात सहभागी होणार असून, या रॅलीत बँड पथक, घोषवाक्यांचे फलक, सैनिकी शाळेचे विद्यार्थी तसेच राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) चे विद्यार्थी सहभागी होणार आहेत. या उपक्रमात शहरातील विविध क्रीडा संघटना, शाळा व महाविद्यालयांचा सहभाग असणार आहे.

वॉक फॉर वोटचा मार्ग शनिवार बाजार येथून सुरू होऊन गांधी पार्क, अष्टभुजा देवी मंदिर, गोल्डन बेकरी, कन्या प्रशाला, वि'यवरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे राजगोपालचारी उद्यान येथे येऊन या उपक्रमाचा समारोप होणार आहे. या ठिकाणी सर्व शालेय विद्यार्थी व नागरिक एकत्र आल्यानंतर कार्यक्रमाचा समारोप करण्यात येणार आहे.

या उपक्रमाच्या नियोजनासंदर्भात नुकतीच महानगरपालिकेत बैठक पार पडली. या बैठकीस निवडणूक अधिकारी नितीन नार्वेकर, स्वीपचे नोडल अधिकारी गणेश शिंदे, क्रीडा मार्गदर्शक रंजीत काकडे, कैलास माने तसेच मतदार जनजागृती पथकातील राजकुमार जाधव, प्रवीण वायकोस, अरविंद शहाणे, मोहन आल्हाट, प्रफुल्ल शहाणे, संजय पेडगावकर, अतुल सामाले, गोविंद कपाटे, अर्जुन झटे, त्र्यंबक वडसकर आदी उपस्थित होते.

'वोट फॉर परभणी' या उपक्रमामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना सहभागी प्रमाणपत्र देण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या समारोपस्थळी राजगोपालचारी उद्यान येथे अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे.

### चित्रकला एक व्यक्तिमत्व विकासाचे आदर्श माध्यम - डॉ.विवेक नावंदर

**परभणी,/प्रतिनिधी :** कलेच्या क्षेत्रात होणारे वैविध्यपूर्ण बदल पाहता व एआय या आधुनिक तंत्रासह झपाट्याने होणारे जागतिक बदल लक्षात घेता चित्राच्या माध्यमातून अभिव्यक्त होण्यासाठी व्यक्तिमत्व घडवण्यासाठी महत्त्वाचे आदर्श साधन म्हणून पाहताना चित्रकलेला महत्त्वाचे स्थान प्रत्येकाने आपल्या आयुष्यात दिले पाहिजे, असे मत बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे सचिव तथा कार्यक्रमाचे उद्घाटक डॉ. विवेक नावंदर यांनी व्यक्त केले.

बाल विद्यामंदिर शिक्षण संस्थेचे प्रेरणास्थान स्व.डॉ. पांडुरंगजी नावंदर (बाबुजी) यांच्या जयंती निमित्त रविवार ४ जानेवारी रोजी अंबीका नगरातील बाल विद्याविहार प्रशालेत भव्य चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते चित्रकला स्पर्धेचे दीप प्रज्वलन व चित्रकलेच्या विषय फलकाचे अनावरण करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, ०२. **पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०३. **मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

०४. **पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी ०५. **सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# लोकशाही जिवंत ठेवण्याचे काम पत्रकार करतात - अमृता नागरे




**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी-**

अखिल भारतीय मराठी पत्रकार संघाच्या वतीने दिनांक ६ जानेवारी रोजी पत्रकार भवन, जिंतूर येथे मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त दर्पण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख वक्त्या अमृता नागरे यांनी मार्गदर्शन करताना, लोकशाही जिवंत ठेवण्याचे महत्त्वाचे काम पत्रकार करतात असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून जेष्ठ पत्रकार निहाल अहेमद हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे,लक्ष्मण बुधवंत,डॉ निशांत मुंढे,शेख अहेमद, अकबर सिद्दीकी,पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष बालाजी शिंदे सोसकर,अजमत पठाण,एकनाथ चव्हाण,शेख नयमुद्दीन हे उपस्थित होते यावेळी जेष्ठ पत्रकारांचा सत्कार करून सन्मान करण्यात आला.यावेळी त्या पुढे म्हणाल्या की,आजच्या काळात सोशल मीडिया आणि एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) यांच्या माध्यमातून फोटो एडिट करून वास्तवाचे वरवरचे चित्र सादर केले जाते. मात्र, अशा परिस्थितीतही पत्रकार सत्य, प्रामाणिकपणा आणि जबाबदारीने बातम्या मांडण्याचे आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत आहेत, हे समाजासाठी आशादायक आहे. पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून समाजाच्या हितासाठी केलेली जबाबदारीची सेवा आहे,असेही त्यांनी स्पष्ट केले. दर्पण दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात पत्रकारितेचे सामाजिक योगदान,बदलते माध्यमविश्व आणि पत्रकारांची जबाबदारी यावर सखोल चर्चा झाली. उपस्थित इतर मान्यवरांनी आपले अनुभव मांडत पत्रकारितेतील आव्हाने आणि संधी यावर विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेख शकील यांनी केले तर आभार सिराज सिद्दीकी यांनी मानले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास तालुक्यातील पत्रकार बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## पत्रकारांनी आपल्या लेखणीतून जे सत्य आहे ते उजेडात आणावे- वैजनाथ हात्तीअंबिरे



**पालम,/प्रतिनिधी-** पत्रकारांनी निर्भीडपणे पत्रकारिता करून आपल्या लेखणीतून जे सत्य आहे ते उजेडात आणावे कोणालाही न घाबरता पत्रकारांनी आपली पत्रकारिता करावी त्याच पत्रकाराची खरी ओळख समाजामध्ये दिसून येते असे प्रतिपाद महात्मा जोतिबा फुले मागासवर्गीय यंत्रमाग चे चेअरमन तथा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते वैजनाथराव हात्तीअंबिरे यांनी पत्रकार दिनाच्या सत्कार समारंभात बोलताना सांगितले पालम स्थानिक पत्रकार संघाचा मंगळवार दिनांक ६ जानेवारी रोजी दर्पण दिनानिमित्त पत्रकाराचा शाल श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला पत्रकाराचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले व मान्यवराच्या उपस्थित कार्यक्रम संपन्न झाले या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मोतीराम शिदे हे होते या वेळी संतोष हातीअंबिरे, विशाल हातीअंबिरे, व पत्रकार शांतीलाल शर्मा,मारोती नाईकवाडे, गुनवत सराफ, चॉद ताबोळी, राहुल गायकवाड, शिवाजी शिदे, घोडिराम कळबे, भास्कर लाडे, आकुश वाघमारे,है लक्ष्मण गायकवाड, उपस्थिती होते.

### पुर्णेत दर्पण दिन साजरा

**पूर्णा,/प्रतिनिधी-** अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने येथील पत्रकार भवनात दर्पण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शहराध्यक्ष मोहन लोखंडे होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पत्रकार राजा रणवीर, विजय बगाटे, सतीश टाकळकर, गजानन हिवरे, सत्कार मूर्ती जगदीश जोगदंड यांची उपस्थिती होती.

प्रथम बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी स्वर्गीय रामेश्वर बियाणी जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल जेष्ठ पत्रकार जगदीश जोगदंड यांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख उपस्थितात संपत तेली,मोहम्मद अलीम, भगवान सोनूले, शेख अफसर शेख सत्तार, सुशीलकुमार गायकवाड , मोहम्मद अनिस बाबुमिया, श्रीहरी घुले, शेख असद, मनोज भुजबळ आदींचा समावेश होता. सूत्रसंचालन अमृत कऱ्हाळे यांनी केले. शेवटी आभारप्रदर्शन पत्रकार प्रा प्रदीप कदम यांनी केले.



### परभणी जिल्हयात थंडीचा जोर वाढला

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्हयात थंडी गेल्या काही दिवसांपासून वाढलेली दिसून येत आहे. त्यामुळे नागरिक चांगलेच हैराण झालेले दिसून आले आहेत. त्यातच या थंडीचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होतांना दिसून येत आहे. सकाळच्या सुमारास नागरिकांची ये-जा करण्याची संख्या चांगलीच कमी झालेली आहे. त्यातच नागरिकांना आरोग्याच्या समस्या चांगल्याच जाणवू लागल्या असल्याकारणामुळे ही थंडी झोंबत आहे.

## जिद्द चिकाटी व मेहनत घेऊन नियोजनबद्धपणे अभ्यास केल्यास यश नक्की प्राप्त होते.....लेखाधिकारी शिल्पा निलावाड

**पूर्णा,/प्रतिनिधी :**स्पर्धा परीक्षेची तयारी सर्वजण करत असतात परंतु जिद्द चिकाटी व मेहनत घेऊन नियोजनबद्धपणे अभ्यास केल्यास यश नक्की प्राप्त होते मी साडेतीन वर्ष कुठलाही सणवार साजरा न करता,कठोर मेहनत घेऊन अभ्यास केल्यामुळे मला वर्ग एक या पदावर गवसणी घेतली आहे असे मनोगत पूर्णा येथील साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयात ७ जानेवारी बुधवार रोजी शिल्पा उत्तमराव निलावाड यांनी व्यक्त केले.




पूर्णा येथील साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयात ७ जानेवारो बुधवारी पूर्णा तहसील कार्यालयातील कर्मचारी शिल्पा उत्तमराव निलावाड यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत वित्त विभागात क्लास वन वर्ग एक पदासाठी लेखाधिकारी म्हणून नुकतीच निवड झाली आहे त्याबद्दल त्यांचा साने गुरुजी सार्वजनिक वाचनालयात सत्कार आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी त्यांनी आपले विचार व्यक्त केली या कार्यक्रमास ॲड. संजय गव्हाणे, पत्रकार संपत तेली, ग्रंथपाल सतीश टाकळकर तसेच वाचनालयातील यावेळी ज्येष्ठवाचक नागनाथ भालेराव, प्रल्हादराव कदम, नागोराव मुळे आदी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रस्तावित ॲड.संजय गव्हाणे यांनी केले तर सूत्रसंचालन संपत तेली यांनी केले तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल सतीश टाकळकर यांनी मांडले.

## ''मदत करा''च्या हाकेला प्रतिसाद : नव्हाती तांड्यात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**जिंतूर,/प्रतिनिधी-** नव्हाती तांडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी ''मदत करा, मदत करा'' अशी भावनिक हाक देत गावात काढलेला व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडिओची तात्काळ दखल घेत संतोष गोविंद राठोड यांनी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदतीसाठी पुढाकार घेतला. विद्यार्थ्यांची परिस्थिती व शिक्षणाची गरज ओळखून संतोष गोविंद राठोड यांनी स्वखर्चातून नव्हाती तांडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅग, ड्रॉइंग वही, नोटबुक, पेन आदी शालेय साहित्याचे वाटप केले. सोशल मीडियावरील एका व्हिडिओमुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना वाचा मिळाली आणि त्यातून प्रत्यक्ष मदतीचा उपक्रम साकार झाल्याचे चित्र यावेळी पाहायला मिळाले. या उपक्रमामुळे नव्हाती तांडा येथील विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण व तांडावासी भागातील शिक्षणासाठी समाजाने पुढे येण्याचा सकारात्मक संदेश या घटनेतून मिळाल्याची भावना ग्रामस्थ, विद्यार्थी व गुरुजन वृंद यांनी व्यक्त केली. दरम्यान, या सामाजिक उपक्रमात विविध मान्यवरांनी आर्थिक सहकार्य केले. भाजपा किसान मोर्चा तालुका अध्यक्ष पिंटू खिस्ते यांनी ११,१११ रुपयांची मदत दिली. तसेच भाजपा युवा मोर्चा अध्यक्ष माधव भाऊ राठोड यांनी २,१०० रुपये, तर उद्धव रखमाजी घुगे यांनी १,१०० रुपयांची मदत करून विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हातभार लावला. या कार्यक्रमाला संजय पवार (चेअरमन, भोसी), परमेश्वर खताळ (भाजपा बूथ प्रमुख, ब्राह्मणगाव), विठ्ठल ठोंबरे (उपसरपंच, भोसी), भास्कर ठोंबरे (भाजपा बूथ प्रमुख, भोसी), सतीश राठोड (सरपंच, वाघी) यांच्यासह शाळेतील विद्यार्थी, गुरुजन वृंद आणि मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते. या उपक्रमामुळे नव्हाती तांडा येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक आधार मिळाला असून, ग्रामीण व तांडावासी भागातील शिक्षणासाठी समाजाने एकत्र येऊन मदत करण्याचा प्रेरणादायी संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला आहे. 'मदत करा'च्या हाकेला मिळाला समाजाचा हात नव्हाती तांडा येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या भावनिक व्हिडिओने समाजाचे लक्ष वेधले. या व्हिडिओची दखल घेत संतोष भाऊ राठोड यांनी पुढाकार घेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप केले. या उपक्रमात विविध मान्यवरांनी आर्थिक सहकार्य केले. ग्रामीण व तांडावासी भागातील विद्यार्थ्यांच्या




शिक्षणासाठी समाजाने एकत्र येऊन मदत केल्यास सकारात्मक बदल घडू शकतो, हे या उपक्रमातून अधोरेखित झाले. ''विद्यार्थ्यांचा 'मदत करा' असा आर्त आवाज पाहून मी अस्वस्थ झालो. शिक्षणाच्या अभावामुळे कोणतेही मूल मागे राहू नये, ही माझी ठाम भूमिका आहे. या मुलांच्या चेहऱ्यावर आलेले हसूच माझ्यासाठी सर्वात मोठे समाधान आहे. ग्रामीण व तांडावासी भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी पुढेही अशाच प्रकारे सहकार्य करण्याचा माझा प्रयत्न राहील,'' :- संतोष गोविंद राठोड, सरपंच कुऱ्हाडी

# समाजाला योग्य-अयोग्य याची जाणीव करून देणारे दर्पण म्हणजे पत्रकार - भाजपा नेते बाळराजे पवार

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.८ जानेवारी**




योग्य-अयोग्य याची मानवाला निवड करता यावी यासाठी अधिकार क्षेत्र स्थापन व्हावी. न्यायपालिका स्थापन व्हावी व समाजात चौथा आधारस्तंभ घडला पाहिजे, समाज घडला पाहिजे, व्यापार पेठ, आरोग्य, शिक्षण व न्याय अशा अनेक पैलूंनी समाज घडला गेला पाहिजे या सगळ्यांचा एक दुवा म्हणजे दर्पण म्हणजे पत्रकारिता होईल असे प्रतिपादन भाजपा नेते लोकनेते बाळराजे दादा पवार यांनी केले.

मंगळवार दि. ६ जानेवारी रोजी दर्पण दिनानिमित्त पत्रकार भवन येथे गेवराई तालुका पत्रकार संघाच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री बदामराव पंडित, नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ गिताभाभी बाळराजे पवार, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, पोलिस निरीक्षक किशोर पवार, राष्ट्रवादी शरचंद्र पवार गटाचे नेते राजेंद्र मोटे आदींची उपस्थिती होती. यावेळी नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ गिताभाभी बाळराजे पवार व सर्व नवनिर्वाचित नगरसेवकांचा गेवराई तालुका पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात आला. तर रोटरी क्लब ऑफ गेवराई यांच्या वतीने सर्व पत्रकारांना सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी पुढे बोलताना बाळराजे पवार म्हणाले की, समाजातील प्रत्येक घटकाच्या अडी अडचणी आणि प्रश्न आहेत. ते सोडून घेण्यासाठी राज्यकर्त्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. त्यामुळे आजही जनहितासाठी लिखाण करणाऱ्या पत्रकारांची समाजाला गरज आहे. त्यामुळे, सर्व वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारांच्या योगदानाची गरज आहे. पत्रकारीता ही कमजोर पडली तरी आरा जगता निर्माण होते. ही आरा जगता टाळावायचे असेल तर पत्रकाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे असे शेवटी बोलताना म्हणाले. यावेळी माजी मंत्री बदामराव पंडित, उपविभागीय पोलिस अधिकारी अनिल कटके, नगर परिषदेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके, यांनी पत्रकार हा समाजातील अन्य व अत्याचार विरूद्ध आवाज उठवणारा व समाजाला योग्य दिशा देणारा असा हे सांगून पत्रकारांना दर्पण दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

तर नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ गिताभाभी बाळराजे पवार यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, पत्रकारांनी माझ्या नेहमी सुखा दुःखात साथ दिली असून यापुढे जमेल तेवढे सहकार्य मी नगरपरिषदेच्या मार्फत शासन दरबारी करुन पत्रकारांना ज्ञाय देण्यासाठी प्रयत्न करेल असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार सुभाष सुतार यांनी व्यक्त करून पत्रकारितेची भूमिका स्पष्ट केली. यावेळी माजी नगरसेवक, तसेच सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रातील सर्व मान्यवर मंडळी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. राजेंद्र बरकसे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गेवराई तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष मधुकर तौर, सचिव दिनकर शिंदे, उपाध्यक्ष सखाराम शिंदे, कार्याध्यक्ष गणेश क्षीरसागर, सदस्य अय्युब बागवान, सुभाष सुतार, प्रा. राजेंद्र बरकसे, जुनेद बागवान, प्रसाद कुलकर्णी, सुशिल टकले, ड हारुण शेख, गजानन चौकटे, शेख इरशाद, सुदर्शन देशपांडे, दत्ता वाघमारे, लक्ष्मण राऊत, अलताफ कुरेशी, अजहर इनामदार, लक्ष्मण आहेर, भरत खराद, धनंजय बजगुडे, श्रीराम बाराहत्ते, रामकिसन तळेकर, गोपाल चव्हाण, मनोज आहेर, विजय नाटकर, कालिदास काकडे, सुरेश गांधले, सुनिल मिसाळ, लक्ष्मण सरपते, सय्यद मुदस्सीर, सतिष वाघमारे आदींनी केले आहे.

# ना.पंकजा मुंडे शनिवारी गहिनीनाथ गडावर

## संत वामनभाऊ महाराजांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यास राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ जानेवारी**

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे उद्या (ता. १०) शनिवारी गहिनीनाथ गडावर येणार आहेत. थोर संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळयास त्या उपस्थित राहणार आहेत.

वारकरी संप्रदायातील थोर संत वै. वामनभाऊ महाराज यांचा पुण्यतिथी सोहळा १० जानेवारीला गहिनीनाथ गडावर संपन्न होत आहे. यंदाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे, यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील यावेळी उपस्थित राहणार आहेत. पुण्यतिथीला गडावर येण्याची लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांची परंपरा पंकजाताई मुंडे यांनी देखील पुढे जोपासली असून दरवर्षी त्या दर्शनासाठी गडावर येतात. एक भक्त म्हणून गडावर विविध विकास कामासाठी त्यांनी शासनाच्या माध्यमातून मोठा निधी दिला होता. शनिवारी सकाळी ११ वाजता पंकजाताई मुंडे यांचे गडावर आगमन होणार असून दर्शन व किर्तनाच्या कार्यक्रमास त्या उपस्थित राहणार असल्याचे त्यांच्या संपर्क कार्यालयातून सांगण्यात आले.

# लोकशाहीत पत्रकारांचे मोठे योगदान - आ.धनंजय मुंडे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.८ जानेवारी**

जगातील सर्वात मोठ्या भारतीय लोकशाहीत पत्रकारांचे मोठे योगदान आहे. परंतु भडंग टी.आर.पी .मिळवण्यासाठी भडक मथळ्याच्या नावाखाली आज-काल बातम्या प्रकाशित केल्या जात असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे माजी कृषिमंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी केले. ते परळी येथे शहर व तालुका पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दर्पण दिन सोहळ्यात बोलत होते.सध्या प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियात प्रचंड बदल झाले आहेत बदलत्या काळानुसार पत्रकारांनी स्वतःमध्ये बदल करायला पाहिजे असे मत त्रिपुरा विद्यापीठाचे माजी उपकुलगुरु डॉ.वि .ल.धारूरकर यांनी केले. पत्रकारांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता सत्य लिहिण्यासाठी घाबरू नये असे आवाहन शिवसेना शिंदे गटाचे बीड जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. टी.पी. मुंडे यांनी केले. परळी शहराच्या विकासासाठी आणि प्रगतीसाठी पत्रकारांनी साथ द्यावी असे आवाहन नवनिर्वाचित नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.पुढे बोलताना आ.धनंजय मुंडे म्हणाले की,एक काळ असा होता की पत्रकारांकडे मोठ्या आशेने पाहिले जात होते.पत्रकारांना एक विचारधारा होती.ती विचारधारा आज अनेकांकडे दिसत नाही.आज सोशल मीडियाच्या माध्यमातून घरा घरात पत्रकार झाला आहे.अनेक आव्हाने पत्रकारितेच्या समोर आहेत परंतु बाळशास्त्री जांभेकर यांची पत्रकारिता डोळ्यासमोर ठेवून काम करण्याची गरज आहे.वर्षातील ३६५ दिवसांपैकी ३६४ दिवस पत्रकारांचे असतात पण दर्पण दिन हा आमच्यासाठी असतो असेही ते म्हणाले व सर्व पुरस्कार विजेता पत्रकारांचे त्यांनी अभिनंदन केले.

परळी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील शासकीय विशेष अतिथी विश्रामगृहाच्या सभागृहात आज ६ जानेवारी रोजी संपन्न झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार व माजी शिक्षण सभापती शंकराप्पा मोगरकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे,परळी नगर परिषदेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, माजी नगराध्यक्ष दीपक देशमुख, माजी नगराध्यक्ष बाजीराव धर्माधिकारी,वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा महासचिव मिलिंद घाडगे, संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय ढोणे,अल्ट्राटेक सिमेंट फॅक्टरीचे जनसंपर्क अधिकारी कुलदीप खोब्रागडे, सामाजिक कार्यकर्ते अनंत इंगळे,मनसे तालूका प्रमुख श्रीकांत पाथरकर, आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी दिपक देशमुख,मिलिंद घाडगे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष रानबा गायकवाड यांनी प्रास्ताविकपर मनोगत व्यक्त करताना दर्पण दिन कार्यक्रमाच्या माध्यमातून भूमिका सांगितली. तसेच कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत सविस्तर माहिती दिली.

# गणेश जयंतीनिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

## श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्याकडून प्रबोधनपर उपक्रम, गणेशयाग पालखी सोहळा, महाप्रसाद

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ जानेवारी**

शहरातील श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्याकडून दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी गणेश जयंतीनिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. यात गणेशयाग पालखी सोहळा काढण्यात येणार असून भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे.

श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांच्या वतीने दरवर्षी प्रमाणेच याही वर्षी गणेश जयंतीनिमित्त २२ जानेवारी २०२६ रोजी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. याच्या नियोजन व तयारीसाठी मंगळवार रोजी श्री गणपती मंदिर ट्रस्ट, चौभारा यांचे पदाधिकारी व भाविक भक्त यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी झालेल्या व्यापक आणि सकारात्मक चर्चेतून प्रबोधनपर कार्यक्रम, गणेशयाग पालखी सोहळा साजरा करणे व भाविक भक्तांना महाप्रसाद वाटप करण्यासंदर्भात सर्वानुमते ठरले. ज्यात कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विविध जबाबदाऱ्यांचे वाटप ही करण्यात आले. या बैठकीस



विजयराव उमणवार, मन्मथअप्पा राऊत, शंकरराव भावठाणकर, शिरीष भावठाणकर, सुभाष सातभाई, शिवप्रसाद राऊत, दयानंद राऊत, शंकर सातभाई, उमाकांत राऊत, वामन भाऊ काळे, अशोक राऊत, नंदकिशोर देशमाने, प्रसाद देशमाने, उमाकांत देशमाने, शंभुलिंग राऊत, दयानंद दगडू राऊत, सुहास सातभाई, माऊली सातभाई, आत्मलिंग राऊत, सतिशराव राऊत, शिवलिंग राऊत, गणेश जाधव, गजानन घोडके, संदीप भावठाणकर, ओमकार धोत्रे, बबनराव शेटे, राहुल भावठाणकर, सत्यम राऊत, ओमकार राऊत, संगम देवशटवार, बाळकृष्ण देशमाने, शिवानंद राऊत, बालासाहेब राऊत, रमेश देशमाने, नागेश्वर राऊत, गोविंद राऊत, यश राऊत यांच्यासह सर्व भाविक भक्त, पदाधिकारी उपस्थित होते. बैठकीचे सुत्रसंचालन श्री गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष राम वसंतराव घोडके यांनी केले तर उपस्थितांचे आभार उपाध्यक्ष संदीप भावठाणकर यांनी मानले.

# बालझुंबड - वैयक्तिक नृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांचे बहारदार सादरीकरण

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.८ जानेवारी**

प्रियदर्शनी क्रीडा, सांस्कृतिक व व्यायाम मंडळाच्या वतीने प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही सलग २६ व्या बालझुंबड मधील वैयक्तिक नृत्य स्पर्धा बुधवार, दिनांक ०७ व गुरूवार, दिनांक ०८ जानेवारी २०२६ रोजी सलग दोन दिवस आयोजित करण्यात आली होती. संयोजक तथा मंडळाचे अध्यक्ष राजकिशोर मोदी, सांस्कृतिक विभागप्रमुख दिनकर जोशी व बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतून आयोजित वैयक्तिक नृत्य स्पर्धेत विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर आधारित गीतांवर आपले बहारदार सादरीकरण केले.




कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अविनाश मुडेगावकर (ज्येष्ठ पत्रकार) हे तर प्रमुख अतिथी म्हणून नगरसेवक आकाश कराड, मुख्याध्यापक तथा प्राचार्य अझहर पठाण (सिनर्जी इंटरनॅशनल स्कूल, घाटनांदूर), मुख्याध्यापक तथा प्राचार्य विनायक मुंजे (जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय) आणि परिक्षक म्हणून प्रथमेश गायकवाड (लातूर), दिपक पदमपल्ले (लातूर) यांची उपस्थिती होती. पुज्य सानेगुरूजी यांच्या प्रतिमेचे पुजन, दीपप्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख मान्यवरांचा सत्कार संयोजक समितीच्या वतीने करण्यात आला. यावेळी बोलताना प्रमुख अतिथी मुख्याध्यापक अझहर पठाण म्हणाले की, मागील २५ वर्षांपासून अव्याहतपणे सुरू असलेल्या बालझुंबडच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक सशक्त व्यासपीठ उपलब्ध झाले आहे. विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्व विकास घडवून आणणे, प्रगतीसाठी हा उपक्रम खूप महत्त्वाचा आहे. वैयक्तिक नृत्य स्पर्धेतून विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, देहबोली, क्रियाशीलता या कौशल्यांचा विकास होतो. विद्यार्थ्यांनी स्पर्धेत यश प्राप्त करावे आणि विविध क्षेत्रात करिअर करण्यासाठी ज्ञान संपादन करावे, बालझुंबड स्पर्धेच्या माध्यमातून आपला सांस्कृतिक वारसा जपला जातो. मला स्पर्धक म्हणून या स्पर्धेत सहभागी होता आले नाही. पण, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित रहात आले याचा मनस्वी आनंद होत आहे. फक्त अभ्यास एके अभ्यास अशी सक्ती पालकांनी मुलांना करू नये तर अशा स्पर्धेत सहभागी व्हायला लावून मुलांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन मुख्याध्यापक तथा प्राचार्य पठाण यांनी करून वैयक्तिक नृत्य स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# प्रश्न विचारणारे विद्यार्थी घडले, तरच समाज खऱ्या अर्थाने शिक्षित होईल - प्रा. तानाजी ठोंबरे

**सावित्रीमाई फुले जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूहाच्या वतीने व्याख्यान**



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.८ जानेवारी**

शिक्षण माणसाला शांत बसायला किंवा डोळेझाक करायला शिकवत नाही, तर प्रश्न विचारण्याची आणि विचार करण्याची ताकद देते. जोपर्यंत प्रश्न विचारणारे विद्यार्थी व तरुण घडत नाहीत, तोपर्यंत समाज खऱ्या अर्थाने शिक्षित होणार नाही, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते प्रा.तानाजी ठोंबरे यांनी केले.

तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने शनिवार, दि.३ रोजी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात आयोजित व्याख्यानात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून कॉम्रेड नामदेव चव्हाण, प्रा.राम गायकवाड, प्रा.अर्जुन राठोड तसेच डॉ.विजयकुमार बांदल, डॉ.अश्विनी बेद्रे, प्रा.डी.डी. राऊत, प्रा.डी.जी.निकाळजे, सौ. उमा जगतकर उपस्थित होते.

क्रांती या शब्दाबाबत बोलताना प्रा.ठोंबरे म्हणाले की, काळाच्या ओघात हा शब्द गुळगुळीत झाला असून कधी तो प्रवाहात तर कधी व्यवस्थेकडून जाणीवपूर्वक बोथट केला जात आहे. ज्योतिराव फुले आणि सावित्रीमाई फुले हे दोघेही तितकेच क्रांतिकारक होते. त्यांच्या संयुक्त कार्यातूनच समाजपरिवर्तनाची व्यापक चळवळ उभी राहिली. सावित्रीमाईंच्या संघर्षमय जीवनातून आजच्या पिढीने निर्भयपणे प्रश्न विचारण्याची आणि सत्याच्या बाजूने ठाम उभे राहण्याची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

# मानवलोक संचलित मनस्विनी महिला प्रकल्पामध्ये जिल्हास्तरीय सामाजिक समानता मेळाव्याचे आयोजन

**प्रत्येक कुटुंबात रूजले पाहिजे, स्त्री - पुरूष समानतेचे मुल्य - डॉ.राजेश इंगोले**

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजागाई दि.८ जानेवारी**

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून महिला आणि युवती तसेच युवक आणि पुरूष यांचे सामाजिक समानता मेळावे मनस्वीनी महिला प्रकल्पामध्ये आयोजित करण्यात आले होते.




यावेळी युवक व पुरूषांच्या मेळाव्यास अंबाजोगाईचे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा व्याख्याता डॉ.राजेश इंगोले तर युवती व महिलांच्या मेळाव्यास स्त्री मुक्ती परिषदेच्या कार्यकर्त्या अलका पावनगडकर व मराठी अभिनेत्री समता जाधव या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ.राजेश इंगोले यांच्या हस्ते क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी बोलताना प्रमुख व्याख्याता डॉ.राजेश इंगोले यांनी अनेक महापुरूषांचे दाखले देत या महापुरूषांनी स्त्रियांना गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी व अंधश्रद्धेच्या जीवनातून मुक्त करून त्यांना सामाजिक समानतेच्या प्रवाहात आणण्यासाठी आटोकाट प्रयत्न केल्याचे उदाहरणांसह स्पष्ट केले. भगवान तथागत गौतम बुद्ध, जगद्गुरू संत तुकाराम, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिराव फुले, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले, विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांना परंपरावादी हाल अपेष्टांतून बाहेर काढून त्यांच्या जीवनाला एक नवी दिशा दिली. ज्या काळामध्ये स्त्रीला चूल आणि मूल याच दोन गोष्टींत अडकवून स्त्री ही फक्त उपभोगाची वस्तू आहे असे मानले जात होते. त्या काळात या महापुरूषांनी स्त्री मुक्तीचा लढा उभारला आणि आज भारतामध्ये स्त्रियांना शैक्षणिक सांस्कृतिक सामाजिक समानता मिळाली.

# त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या वतीने एक दिवशीय युवा कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.८ जानेवारी**

त्रिरत्न बौद्ध महासंघ आयोजीत आधुनिक जगात आंबेडकरी युवक या विषयावर एक दिवशीय युवा कार्यशाळा रविवार दि ११ जानेवारी सकाळी ९:३० आयोजित करण्यात आली आहे.युवकांनी केवळ महत्त्वाकांक्षाच नव्हे, तर चारित्र्य, सत्यनिष्ठा आणि नैतिक सामर्थ्य जोपासले पाहिजे. या दृष्टीने त्रिरत्न बौद्ध महासंघाच्या वतीने एक दिवशीय युवा कार्यशाळा फ्लाईंग बर्डस् अकॅडमी अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये रविवार दि. ११ जानेवारी सकाळी ९:३० ते ५:३० दरम्यान आयोजित करण्यात आली आहे.आधुनिक जगात आंबेडकरी युवक या विषयावर पुणे येथील धम्मचारी ज्ञानसंभव व धम्मचारी सामसिद्धी हे मार्गदर्शन करणार आहेत. युवक-युवतींनी कार्यशाळेला उपस्थित रहावे असे आवाहन धम्मचारी अमोलरत्न,धम्मचारी मंजुरक्षित,धम्ममित्र नवनाथ शिनगारे, धम्ममित्र लक्ष्मन पोटभरे ,धम्ममित्र दीपक भालेराव , धम्म मित्र लक्ष्मण सहजराव,धम्ममित्र वंदना नाकलगांवकर,धम्ममित्र रामभाऊ बनसोडे ,धम्ममित्र आकाश शिंदे , धम्ममित्र सम्राट डोंगरे ,प्रा.सुदर्शन स्वामी,रविकांत उघडे, सचिन उजगरे, , किरणताई ढाकरगे, पुष्पाताई रणदिवे, मुरलीधर साळवे, जी.एन. घनघाव,,ज्योती साळवे, राहुल निसर्गंध, मिना राऊत, अभिजीत साळवे आदी धम्म बांधवांनी केले आहे.

## जन शिक्षण संस्थान बीड द्वारा विविध ठिकाणी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम संपन्न.



जन शिक्षण संस्थान बीड द्वारा क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती कार्यक्रम संपन्न. दीनदयाल शोध संस्थान, जन शिक्षण संस्थान बीड द्वारा जिल्ह्यात २००४ पासून कौशल्य विषयक प्रशिक्षणातून स्वावलंबनाचे कार्य सुरू असून टेलरिंग,पार्लर, इलेक्ट्रिकल टेक्निशियन, टू व्हीलर रिपेरिंग, मोबाईल दुरुस्ती, सोलार टेक्निशियन अशा विविध प्रकारच्या प्रशिक्षणातून हजारो यशोगाथा बीड जिल्ह्यात कार

# पोलिस अधीक्षक कार्यालयात विशेष बाल पोलिस पथक कार्यशाळा




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय येथे पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांचे मार्गदर्शनाखाली जिल्ह्यातील बालकांशी संबंधित सर्व विभागासोबत समन्वय साधत कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.
सदर कार्यशाळेत प्रशिक्षक म्हणून अमरावती येथील दिशा संस्थेचे अध्यक्ष प्रवीण खांडपासोळे यांना आमंत्रित करण्यात आले. सदर प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये बालकावर होणारे लैंगिक अत्याचार कायदा, बाल न्याय अधिनियम त्यामधील तरतुदी याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.
काळजी व संरक्षणाची गरज असलेले बालक तसेच विधी संघर्ष ग्रस्त बालक यांचे बाबत घ्यावयाची काळजी व कायदेशीर प्रक्रिया तसेच लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियममधील तरतुदी इत्यादी बाबत अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शन प्रशिक्षक श्री खांडपासोळे यांच्याकडून देण्यात आले. तसेच बालकल्याण समिती समोर आणि बालन्याय मंडळासमोर बालकांना हजर करताना कोणती दक्षता घेण्यात यावी याबाबत सुद्धा मार्गदर्शन संबंधित विभागातील अधिकारी यांच्याकडून देण्यात आले..
सदर कार्यशाळेस विशेष बाल पोलीस पथकामध्ये कार्यरत जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाणे मधील अधिकारी व अंमलदार तसेच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्रीमती सरस्वती कोरडे, बाल कल्याण समितीचे सदस्य हेंबाडे, बाल न्याय मंडळ सदस्य ॲड. सत्यशीला अहिरे, बालगृह खानापूर चित्ता अधीक्षक पवार, मुलींचे निरीक्षण गृह हिंगोली अधीक्षक घ्यार, उमंग शिशुगृह, हिंगोली अधीक्षक शिरसाट, दिशा संस्थेचे सामाजिक कार्यकर्ते बद्री गायकवाड, पुनम महाडिक, ॲड. अनुराधा पंडित तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार केंद्रे, स्थागुशा अधिकारी शिवसांब घेवारे, भरोसा सेल येथील सपोनी प्रेमलता जगताप, सीमा पाटील, वर्षा शिंदे, आरती साळवे इत्यादी उपस्थित होते.

# जि प च्यावतीने दिव्यांग बालकांच्या क्रिडा स्पर्धांचे हिंगोलीत उद्‌घाटन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**
जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्यावतीने गुरूवारी येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर दिव्यांग बालकांच्या क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धांचे उद्‌घाटन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याहस्ते करण्यात आले.
यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, पोलिस अधीक्षक डॉ नीलभ रोहन, अप्पर जिल्हाधिकारी महेंद्र कांबळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विजय बोराटे, समृध्दी दिवाने, समाज कल्याण उपायुक्त गीता गुठ्ठे, राऊत, गंगावणे आदींची उपस्थिती होती.
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता आणि पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांनी हिरवी झेंडी दाखवून दिव्यांगांच्या रनिंग स्पर्धेचा शुभारंभ केला. यावेळी जिल्ह्यातील अनुदानीत दिव्यांग शालेय विद्यार्थ्यानी मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभाग घेतला होता.
विविध क्रिडा स्पर्धा तसेच संध्याकाळी येथील महावीर भवन येथे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांनी त्यांच्या विविध कलागुणांना वाव दिला तसेच नृत्य, गाणी, नाटीका आदी कार्यक्रम सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली.
यावेळी बोलतांना राहुल गुप्ता म्हणाले की, क्रिडा स्पर्धामधून आनंदासोबतच शारीरिक आणि मानसिक विकास होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी स्पर्धामध्ये सहभाग घेतला पाहीजे. तसेच सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या अंगी असलेले कलागुण विकसित होतात. यावेळी त्यांनी आयोजकांचे कौतुक केले. त्यानंतर मान्यवरांच्याहस्ते क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धामध्ये विजयी झालेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

# तीन शिक्षकांची राज्यस्तरीय काव्यवाचन स्पर्धेसाठी निवड





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**
राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या वतीने राज्यातील राज्य मंडळाच्या अधिनस्त असणाऱ्या स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, व उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, डाएट मधील अधिकारी, कर्मचारी, तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये शैक्षणिक प्रशासकीय कौशल्य वृध्दिंगत करण्यासाठी,भाषिक व सादरीकरण कौशल्यांना चालना देण्यासाठी राज्यस्तरीय स्वरचित काव्यसादरिकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यात शासनाने सुरुवातीला केंद्रस्तर, तालुका स्तर ते जिल्हा स्तरावर काव्य वाचन स्पर्धा घेतली होती. त्यात पाच शिक्षक निवडून ते विभागावर पाठविले होते. त्यात ग्रामीण कवयित्री सौ.सिंधूताई दहिफळे, युवाकवी अनिकेत देशमुख आणि रानकवी राजकुमार मोरगे यांचा समावेश होता. या तिघांनी डिसेंबर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी छत्रपती संभाजीनगर विभगावरील स्पर्धेत अंबाजोगाई येथे जावून आपल्या स्वरचित कविता सादर केल्या होत्या.त्या स्पर्धेचा निकाल नुकताच डाएट प्रशिक्षण संस्था हिंगोलीस प्राप्त झाला आहे. त्यात अभिमानाची गोष्ट म्हणजे हिंगोली जिल्ह्यातील तीन शिक्षकांनी बाजी मारत राज्य स्पर्धेत आपले स्थान टिकवून ठेवले आहे. विशेष म्हणजे विभागीय स्पर्धेतील ४० स्पर्धका पैकी पाचजण राज्यस्तरावर पाठविले जाणार होते.त्यात हिंगोली जिल्ह्यातील तीन शिक्षकांनी आपल्या बहारदार आणि पहाडी आवाजातील कविता सादर करून राज्यस्तरावर मजल मारली आहे. त्यांच्या निवडीचे पत्र प्राप्त झाले असून त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या निवडीमुळे साहित्य क्षेत्रात सुध्दा आनंदाचे वातारण निर्माण झाले आहे. मोठ्या प्रमाणात त्यांच्यावर शिक्षक आणि अधिकारी वर्गाकडून शुभेच्छाचा वर्षाव होत आहे.



**हिंगोली– पोलिस विभागाचेवतीने गुरूवारी शहरातील स्वप्नील अप्पा उबाळे यांच्या घरावर छापा मारून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शासनाने प्रतिबंधीत केलेला दीड लाख किंमतीचा गुटखा जप्त केला. सदरील कार्यवाही पोलिस अधीक्षक डॉ निलभ रोहन, अप्पर पोलिस अधीक्षक कमलेश मीना, स्थागुशाचे पोनि मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शिवसांब घेवारे, उपनि माधव जिव्हारे, अंमलदार सतीश जाधव, किशोर सावंत, आजम प्यारेवाले, खंडागळे, साळवे, गोरे, आत्राम, शिंदे, बांगर, हराळ, टापरे आदींनी बजावली**

## संक्षिप्त वृत्त

### ११ जानेवारीला रक्तदान शिबीराचे आयोजन

हिंगोली– स्वामी विवेकानंद जनसेवा फाउंडेशनच्या वतीने दि. ११ जानेवारी २०२६ (रविवार) रोजी एक रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या सामाजिक उपक्रमाचा शुभारंभ सकाळी यज्ञ हवनाने करण्यात येणार असून, कार्यक्रमाला आध्यात्मिक व सामाजिक जाणिवेची जोड देण्यात येणार आहे. समाजातील गरजू रुग्णांना वेळेवर रक्तपुरवठा व्हावा व रक्तदानाबाबत जनजागृती व्हावी, या उदात्त हेतूने हे शिबिर आयोजित करण्यात येत आहे. या रक्तदान शिबिराचे आयोजन महावीर भवन हिंगोली येथे सकाळी १० वाजता ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत करण्यात आले असून, रक्तदान शिबिरामध्ये शासकीय रक्तपेढी तसेच गोळवलकर गुरुजी रक्तपेढी, नांदेड यांच्या सहकार्याने रक्तसंकलन करण्यात येणार आहे. अनुभवी वैद्यकीय अधिकारी व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या देखरेखीखाली रक्तदान प्रक्रिया पार पडणार असून, रक्तदात्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्यात येणार आहे. स्वामी विवेकानंद जनसेवा फाउंडेशनचे पदाधिकारी यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, निरोगी वयस्क नागरिकांनी पुढे येऊन या रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे व मानवतेच्या सेवेत आपले योगदान द्यावे. रक्तदानामुळे अनेक रुग्णांचे प्राण वाचू शकतात आणि हेच खरे समाजसेवेचे कार्य आहे. रक्तदान करणाऱ्या दात्यांना प्रमाणपत्र व अल्पोपहाराची व्यवस्था करण्यात आली आहे. अधिक माहितीसाठी किंवा नोंदणीसाठी ७०२०९५७६५६,९८५०२५२४६७,९८२२१५९०८८ वर संपर्क साधावा, असे आवाहन फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

### प्रा. डॉ. विजय गायकवाड यांना पुरस्कार प्रदान



हिंगोली– खंडाळा ता. जि. हिंगोली येथील सेवा निवृत आदर्श मुख्याध्यापक श्री रामराव शंकरराव गायकवाड यांचे सुपुत्र प्रा. डॉ. विजय शशिकला रामराव गायकवाड यांना शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात केलेल्या समाजपयोगी, प्रेरणादायी व उल्लेखनीय कामगिरी बद्दल सिंधू बहुउद्देशीय सेवाभावी संस्था अंधारवाडी यांच्याकडून दिला जाणारा मराठवाड्याचा सन्मान असलेला प्रतिष्ठित मराठवाडा रत्न हा पुरस्कार हिंगोलीचे जिल्हाधिकारी राहुलजी गुप्ता, शिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारे, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गुप्ता, मुद्रांक जिल्हाधिकारी महेशजी वडदकर, भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्रोचे योगेश सांगळे, आय ए एस मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, सिंधू बहुउद्देशीय संस्था अंधारवाडी जीवन गाणे गातच राहावेचे अध्यक्ष प्रा गोपाल बोस यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

# औंढ्यात गटविकास अधिकाऱ्याच्या प्रतिकात्मक पुतळ्याची मिरवणूक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**
औंढा नागनाथ तालुक्यात विविध योजनेमध्ये लाभार्थ्यांचे रखडलेले अनुदान द्यावे या मागणीसाठी गुरूवारी उबाठा शिवसेनेच्यावतीने गटविकास अधिकाऱ्यांच्या प्रतिकात्मक पूतळ्याची गाढवावरून मिरवणूक काढीत पंचायत समिती कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. औंढा नागनाथ पंचायत समितीअंतर्गत राबविल्या जाणाऱ्या प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना,शबरी आवास योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुलाच्या अनुदानाचा हप्ता देण्यात आलेला नाही. काही लाभार्थ्यांना पहिला तर काहींना दुसरा हप्ता देण्यात आला. या अनुदानामुळे लाभार्थ्यांनी त्यांची कच्ची घरे पाडून पक्की घरे बांधण्यात सुरूवात केली. मात्र मागील काही महिन्यांपासून अनुदानाचा हप्ता देण्यात आला नाही. त्यामुळे लाभार्थी अडचणीत सापडले आहेत. वारंवार पंचायत समितीमध्ये चकरा मारूनही अभियंत्यांसह इतर यंत्रणा कारणे सांगून त्यांना परत पाठवत आहेत. आर्थिक व्यवहार झाल्याशिवाय लाभार्थ्यांना पैसे दिल्या जात नाहीत अशाही तक्रारी लाभार्थी करीत आहेत.
याशिवाय महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत विहीरीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मागील सहा ते आठ महिन्यांपासून त्यांचेही अनुदान वाटप झाले नाही. हीच परिस्थिती जनावरांच्या गोठ्याच्या अनुदानाबाबत आहे. कामांचे हजेरीपत्रक बंद झाल्यामुळे मजुरांची मजुरी थकली असून त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.
लाभार्थ्यांचे अनुदान तत्काळ वाटप करावे या मागणीसाठी उबाठा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी गटविकास अधिकारी यांच्या प्रतिकात्मक पूतळ्याची चक्क गाढवावरून मिरवणूक काढीत आंदोलन केले. त्यानंतर पंचायत समिती कार्यालयात निवेदन सादर करण्यात आले. यावेळी ज्ञानेश्वर झटे, माऊली मगर, दत्ता अंभोरे, संजय भामिरगे, डॉ चंद्रमणी, पाईकराव, विष्णु कटके आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# धाब्यावरील जेवण, चहा, दूधमधील भेसळ आणि स्वच्छतेवर प्रश्नचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ८ जानेवारी**
शहरात हायवेवर व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात चालणाऱ्या धाबे व चहाच्या हॉटेलमधील दूध, पाणी, मसाले, भाजीपाला आणि खाद्यतेल यांच्या गुणवत्तेवर गंभीर शंका उपस्थित होत आहे. चकचकीत जाहिराती आणि चवदार मेन्यूच्या आड अस्वच्छ स्वयंपाकघर, दूषित पाणी आणि भेसळीचा संशयित वापर याचे आरोप नागरिकांकडून होत आहेत.
लोकवर्गणेनुसार, अनेक धाब्यांवर बाहेर स्वच्छ आत घाण, स्टोव शेजारी वापरलेले तेल पुन्हा गरम करून वापरणे, पावडर, केमिकल मिश्रित दूध व चहा, एक्सपायरी वस्तूंचा वापर?असे प्रकार सर्रास दिसत आहे. भेसळ व अन्नसुरक्षा अधिकारी मात्र गायब? अन्न व औषध प्रशासन अधिकारी निरीक्षणासाठी येतात का नाहीत? कारवाई केव्हा होईल आणि होणार तरी का? तपासणी फाइलमध्येच अडकून आहे का? तपासणीचे अधिकार असलेले अधिकारी नावापुरते आहेत की गायब? यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. ग्राहक म्हणज बळीचा बकरा नाही! ग्राहकाला फक्त बिलाची पावती देतात, गुणवत्तेची हमी मात्र कधीच देत नाहीत.आपण विचारतो का?दूध शुद्ध आहे का? पाणी फिल्टर आहे का?तेल एकदाच वापरले की पुन्हा,किचन स्वच्छ आहे का नाही, कारण आपल्या प्लेटपर्यंत जेवण येईपर्यंत आपणच अंध होत जातो.चहाचा कप, वडा-पाव, बिर्याणी, मिसळ, तंदूर चव लोकांना मिळतेय, पण आत काय जातंय ते कोणाला माहिती आणि याच अंधाराचा फायदा काही हॉटेलधारक घेत आहेत. धाबे, हॉटेल, चहाची टपरी यांची तातडीने तपासणी करून घ्यावी नमुने घेऊन भेसळ चाचणी करण्यात यावी. दोषींवर गुन्हा नोंदवून परवाना रद्द करावा. प्रशासनाने अजूनही कानाडोळा सुरू ठेवला, तर अन्नविषबाधा आणि आजारांचे मोठे संकट ओढवणार, अशी भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. हॉटेलची चमक वेगळी, किचनची दुर्गंधी वेगळी, प्रशासन तपासणीसाठी येईपर्यंत, ग्राहकांच्या आरोग्याचा कसा विचार होणार असा सवाल उपस्थित होऊ लागला असून अन्न व औषध प्रशासन अधिकारी गाढ झोपेत आहेत.

# हिंगोलीतील पत्रकार भवनावरील ताबा सोडण्यासाठी नोटीस

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**
शहरातील औंढा रोडवरील पत्रकार भवनाच्या जागेत काही जणांनी अतिक्रमण करून जागा ताब्यात घेतली असून ही जागा दोन दिवसांत खाली करण्याबाबत उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी गुरूवारी ताबाधारकांना नोटीस बजावली आहे.
शहरातील औंढा रोडवर सरकारी मालमत्ता शासकीय स नं १४६/१ मधील क्षेत्र २८८ चौमी मालमत्ता पत्रक क्र ५२७६ अ नगरपरिषद मिळकत क्रमांक २३-१६३३ बाबत आदेश पारीत करून शासन समप्रित करण्यात आली असूनही या जागेवर अनेक वर्षापासून ताबा करण्यात आला आहे. सदरील ताबा दोन दिवसांत सोडण्यात यावा अशाप्रकारची नोटीस उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी अध्यक्ष देवीदास देशमुख, म इशतीयाक म इसाक, पठाण खाजा खान अमीन खान, नीजर उलाखान दादे खान यांना बजावली आहे.
सदरील ताबा दोन दिवसात न सोडल्यास पोलिस बंदोबस्तात जागेचा ताबा घेण्यात येणार असल्याचे यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे यांनी सांगितले.
दरम्यान, मागील अनेक वर्षापासून पत्रकारांसाठी पत्रकार भवनाचे बांधकाम करण्यात आले. तत्कालीन आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, देविदास देशमुख यांनी पुढाकार घेऊन जागा आणि बांधकामासाठी निधी आणला परंतु या पत्रकार भवनाचा पत्रकारांना कधीच फायदा झाला नाही. त्यानंतर आ. तान्हाजीराव मुटकुळे यांचेकडेही पत्रकारांनी पत्रकार भवन खाली करून देण्याची मागणी केली होती परंतु त्यानंतर आ. मुटकुळे पाठपुरावा केला मात्र काहीच कार्यवाही झाली नाही. आता उपविभागीय अधिकारी घुटुकडे यांनी केलेली कार्यवाही पत्रकारांच्या किती पथ्यावर पडणार हे कारवाईनंतरच कळणार आहे.

# एकलव्य ज्ञानवर्धिनी सामान्य ज्ञान परीक्षेत भारतीय विद्या मंदिरचे यश




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ८ जानेवारी**
भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी एकलव्य ज्ञानवर्धिनी सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षा, नागपूर मध्ये यश संपादन केले आहे. प्राथमिक गटातून इयत्ता सातवीची अंजली पडोळे प्रथम, कोमल कोरडे द्वितीय, तर सहावीचा शिवशंकर माने तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. स्वरा राऊत व प्रथमेश पडघन यांना प्रोत्साहनपर पारितोषिक प्राप्त झाले. माध्यमिक मधून इयत्ता आठवी ची खुशी पडोळे प्रथम, वैष्णवी हनवंते द्वितीय तर इयत्ता नववी मधून पायल पाईकराव प्रथम, हनुमान जाधव द्वितीय, समर्थ चुकेवार तृतीय आला असून साई मगर, श्रावणी शेळके व प्रकाश कांबळे यांनी प्रोत्साहनपर पारितोषिक प्राप्त केले आहे. विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले तर प्रोत्साहनपर पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.मार्गदर्शक अध्यापिका जयश्री धुमाळ, तुकाराम खिल्लारे व सर्व यशस्वी विद्यार्थी यांचा सत्कार विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे यांच्या हस्ते करण्यात आला. पर्यवेक्षक अनिल लोळेवार व भारत शिंदे तसेच भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक अध्यापक यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# गटविकास अधिकाऱ्याला धक्काबुक्की ; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**लोहा, दि. ८ जानेवारी-**

पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी विविध योजनेतील कामे, वेळेत करत नसल्याची ,तक्रार माहिती अधिकार कार्यकर्ता व पत्रकार असल्याचे सांगत आरडाओरड करून धुडगूस घातला कर्तव्यावर असलेले गटविकास अधिकाऱ्यास शिवीगाळ करत धक्काबुक्की करून जीवे नमारण्याची धमकी दिल्यामुळे पोलिसांत गुन्हा दाखल केला.

मागील कांहीं दिवसांपासून माहिती कार्यकर्ता व पत्रकार असल्याचे सांगून लोहा शहरात वास्तव्यास असलेला बालाजी अर्जुन शिंदे हा लोहा पंचायत समिती कार्यालयात अनेक विभागातील टेबलवर जाऊन कर्मचाऱ्यांना सातत्याने त्रास देत असल्याचे पोलिसांना दिलेल्या तक्रारीत नमूद केले आहे. गटविकास अधिकारी महेंद्र मधुकरराव कुलकर्णी हे कार्यालयात उपस्थित झाले आणि कॅबिनमध्ये बसून कामकाज करत असताना सकाळच्या वेळी आंदाजे साडेदहा वाजताच्या सुमारास गटविकास अधिकारी यांच्या कॅबिन बाहेर जोरजोरात आरडा ओरडा होत असल्याचा आवाज आल्याने गटविकास अधिकारी कुलकर्णी यांनी कॅबीनच्या बाहेर जावुन पाहीले आसता बालाजी आर्जुन शिंदे हा घरकुल विभागातील कर्मचारी दिनेश तेलंग व प्रदिप पवार यांच्या सोबत हुज्जत घालुन तुम्ही व्यवस्थीत कामकाज करीत नाही आसे सांगत होता आसे बोलत वाद घालत होता.

गटविकास अधिकारी कुलकर्णी यांनी शांत पद्धतीने बोलण्याची विनंती केली मात्र शिंदे यांची ऐकण्याचे मनस्थीती नव्हती. काही वेळाने बालाजी शिंदे हा गटविकास अधिकारी यांच्या दालनात येऊन तावातावाने आरडा ओरड करत आला. केबिन बाहेरील सेवकास धक्काबुक्की करुन त्याने

आत जाऊन टेबलावर हात मारुन तुम्ही घरकुलाचे काम व ईतर कामे बरोबर करीत नाहीत व तुम्ही वेळेवर कार्यालयात हजर राहत नाहीत म्हणत शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. याप्रसंगी आवाज ऐकून कार्यालयातील कर्मचारी शाम गुंडावार, शिवकुमार घोडके, संतोष गायकवाड, प्रताप रायघोळ व ईतर कर्मचारी तसेच आधिकारी आले त्यांनाही तुम्ही कार्यालयाचे बाहेर निघा असे कर्मचाऱ्याने सांगताच तुमची बघतो आसे म्हनुन धमकावत नीघुन गेला.

सातत्याने शिंदे हा कार्यालयात येवुन आरेरावीची भाषा करुन मी माहीती आधीकार कार्यकर्ता व पत्रकार आहे त्यामुळे तुमची तक्रार करतो आणि वर्तमानपत्रात बातमी देऊन बदनामी करतो म्हणुन नेहमी धमकी देत आसतो. असे गटविकास अधिकारी कुलकर्णी यांनी तक्रारीत नमूद केले आहे. सदरील गंभीर घटनेप्रकरणी पोलिसात बालाजी शिंदे विरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोहेकाँ संतोष खाडे हे करीत आहेत.

# श्री रेणुकादेवी संस्थानचे ६४ कर्मचारी अखेर कायम

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. ८ जानेवारी-**

श्री रेणुकादेवी संस्थान श्री क्षेत्र माहूरगड येथील पाच वर्षांपासून कार्यरत असणाऱ्या ६४ अधिकारी, कर्मचाऱ्यांना कायम पणाचा फायदा देण्याचे निश्चित झाले आहे. दि. २३/१२/२०२५ रोजीच्या ठराव क्रमांक ०३ नुसार सर्व विश्वस्त मंडळाच्या संमतीने याबाबत निर्णय घेण्यात आला असून, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश नांदेड तथा अध्यक्ष श्री रेणुकादेवी संस्थान,सुनील वेदपाठक आणि सहाय्यक जिल्हाधिकारी,किनवट तथा सचिव श्री रेणुकादेवी संस्थान जेनीत चंद्रा दोन्तुला यांच्या स्वाक्षरीने नियुक्ती आदेशही पारीत करण्यात आले आहेत.

श्री रेणुकादेवी संस्थान माहूरगड येथील मागील पाच वर्षापासून कार्यरत ६४ कर्मचारी यांना ०१ डिसेंबर २०२५ पासून कायमपणाचे फायदे कायम नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत. येथील कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा विचार करून प्रमुख जिल्हा सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष श्री रेणुकादेवी संस्थान सुनील वेदपाठक,सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट तथा सचिव जेनीत चंद्रा दोन्तूला, उपविभागीय पोलिस अधिकारी,माहूर तथा उपाध्यक्ष किरणकुमार भोंडवे, तहसीलदार माहूर तथा कोषाध्यक्ष अभिजीत जगताप तसेच विश्वस्त चंद्रकांत भोपी, संजय काण्णव, विनायकराव फांदाडे, आशिष जोशी, बालाजी जगत, अरविंद देव, दुर्गादास भोपी, व्यवस्थापक जिल्हा सत्र न्यायालय, नांदेड आवटे यांनी अभ्यासपूर्ण विचार करून कर्मचारी यांची सेवा नियमावली व आकृतीबंध वेतन निश्चिती,वार्षिक वेतन वाढ, कर्मचारी यांचे भविष्य उज्वल होण्याच्या उद्देशाने तयार केले आहे.

प्राप्त आदेश पत्रानुसार संस्थानातील कर्मचाऱ्यांचे वर्ग १, वर्ग २ व वर्ग ३ असे वर्गीकरण करण्यात आले आहे.यामध्ये वर्ग १ कर्मचाऱ्यांसाठी ३०,०००, वर्ग २ साठी १९,००० व वर्ग ३ साठी १६,००० रुपये इतके मासिक वेतन निश्चित करण्यात आले आहे. तसेच वार्षिक वेतनवाढ म्हणून



अनुक्रमे वर्ग १ साठी २,०००, वर्ग २ साठी १,५०० व वर्ग ३ साठी १,००० रुपये इतके देण्यासंदर्भात विश्वस्त मंडळाच्या संमतीने सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला आहे.

त्या अन्वये श्री रेणुकादेवी संस्थानचे ६४ कर्मचारी/अधिकारी यांना ०१ डिसेंबर २०२५ त्याच्या मुळ नियुक्ती पदावर आणि पुढे नमुद श्रेणी मध्ये कायम करण्याचा आदेश अध्यक्ष श्री रेणुका देवी संस्थान माहुर सुनील वेदपाठक (प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश) आणि सचिव श्री रेणुकादेवी संस्थान माहूरगड जेनित चंद्रा दोन्तुला (सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट) यांनी त्यांच्या स्वाक्षरीने संयुक्तपणे पारीत केला आहे.

सदरची सर्व प्रक्रिया मंगळवार दि. ०६ जानेवारी रोजी पूर्ण करण्यात आली. अनेक दिवसापासून प्रलंबित असलेला कर्मचाऱ्यांचा हा प्रश्न निकाली काढल्यामुळे अरुण घोडेकर व श्रावण जाधव यांनी संस्थानचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सुनील वेदपाठक यांचा सर्व लाभार्थी कर्मचाऱ्यांच्यावतीने सत्कार केला.

या निर्णयामुळे संस्थानच्या सर्व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाची लाट उसळली असून,सर्व कर्मचाऱ्यांच्यावतीने संस्थानचे कर्मचारी श्रावण जाधव,अरुण घोडेकर, अरविंद राठोड,नितीन गेडाम , आकाश वानखेडे, गजानन घुगे ,विनोद कदम, विष्णू जाधव,अमोल राऊत यांनी संस्थांनचे सर्व पदाधिकारी, विश्वस्त समितीचे आम्ही कायम ऋणी राहूत,अशा शब्दात आभार प्रतिक्रिया व्यक्त करत आई जगदंबा श्री रेणुकादेवीचा एकप्रकारे कृपाशीर्वादच मिळाला असल्याच्या ऋणी भावना व्यक्त केल्या आहेत.



## मुदखेड मध्ये मराठी पत्रकार संघाच्या वतीने दर्पण दिन साजरा

**मुदखेड** -मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांनी ०६ जानेवारी १८३२ रोजी मराठी वृत्तपत्राची सुरुवात केली. महाराष्ट्रात सर्वत्र दर्पण दिन म्हणून साजरा केला जातो. त्या अनुषंगाने मुदखेड शहरात मुदखेड तालुका मराठी पत्रकार संघाच्या वतीने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजित पुतळ्याच्या फलकास पुष्पहार अर्पण करून बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर मुदखेड नगर परिषदेच्या वतीने नवनिर्वाचित लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ विश्रांती पाटील कदम यांच्या वतीने पत्रकारांना लेखणी व डायरी पुष्प देऊन स्वागत करण्यात आले पत्रकाराने शहर विकासासाठी अनेक उपयोजना सुचवून सकारात्मक बातम्या देऊन सहकार्य करण्याचे आवाहन नूतन नगराध्यक्षा सौ. विश्रांती कदम यांनी केले. यानंतर माधव पाटील कदम यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंती व दर्पण दिनानिमित्त पत्रकारांना शुभेच्छा दिल्या. यावेळी पत्रकार प्रल्हाद मस्के, नगरसेवक संजय आऊलवार,संदिप मोडवान यांनी आपले विचार मांडले. माजी नगरसेवक कैलास गोडसे, अभियंता सुमित गोडसे यांनी जनसंपर्क कार्यालयात समस्त पत्रकारांना दस्ती लेखणी पुष्प देऊन सत्कार सन्मान करण्यात आला. तसेच मुदखेड पोलीस ठाण्यात पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या वतीने डायरी लेखणी पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला. लोकमंगल मल्टिस्टेट बँकेच्या वतीने सन्मान व सत्कार करण्यात आला. मुदखेड पोलीस ठाण्याचे पो. नि. यानी पत्रकारांच्या लेखनीतून समाजाला दिशा देण्याचे काम केले जाते शासन प्रशासन सुरळीत चालण्यासाठी लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभाचे महत्त्वपूर्ण काम असून पत्रकारांनी निर्भीडपणे कार्य करत राहावे पोलीस प्रशासन आपल्या पाठीशी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या दर्पण दिनाच्या कार्यक्रमात पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, शेख अजगर हुसेन पाशाभाई, ईश्वर पिन्नलवार जिल्हा सहसचिव, संतोष पाटील गाढे, जयराम वन्ने, उत्तम हनुमंते,रुखमाजी शिंदे साहेबराव गागलवाड, नामदेव राहेरे, अतिक अहेमद, दिनेश शर्मा, साहेबराव हौसरे, धम्मदाता कांबळे, अब्दुल रझाक, संतोष सावंत, शेख इरफान, संतोष दर्शनवाड,शेख शमशुद्दीन, मनोज कमटे, देवानंद गुंजाळ, आशिष कल्याने अमोल टेकले, हाफिज खुरेशी, म.हाकिम, पिराजी गाडेकर,अजय कांबळे, यासह आदींची उपस्थिती होती. सर्व नियोजित कार्यक्रमात सुरेख सुत्रसंचालन पत्रकार संजय कोलते जिल्हा संघटक यांनी केले. दर्पण दिनानिमित्त शहरात अनेक ठिकाणी पत्रकार संघाच्या सदस्यांना पुष्प देऊन सत्कार व सन्मान करण्यात आला.

# हदगावच्या नगराध्यक्षपदी रोहिणी वानखेडे विराजमान

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. ८ जानेवारी-**




हदगावच्या नगर परिषदेच्या निवडणुकीमधील शिवसेना व भाजपा युतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. रोहिणी भास्कर वानखेडे यांच्या दणदणीत विजयानंतर त्यांचा नगराध्यक्ष पदाचा पदग्रहण सोहळा आज दि.८ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आला होता . त्यांच्या राहता घरापासून नगरपरिषदेपर्यंत भव्य पदयात्रा काढत वाजत- गाजत आतिशबाजी करत मान्यवरांच्या उपस्थितीत नगराध्यक्ष पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी या कार्यक्रमास व्यासपीठावर उपस्थित विधान परिषद सदस्य तथा अध्यक्ष कॅबिनेट मंत्री दर्जा हेमंत पाटील, आ. बाबुराव कदम कोहळीकर, माजी खा.सुभाषराव वानखेडे ,उमरखेडचे आमदार वानखेडे ,नगर परिषदेचे मुख्याधिकारी गौरव वांडेकर, भास्कर दादा वानखेडे यांच्यासह शिवसेना पक्षाचे जिल्हाप्रमुख, भाजपाचे प्रमुख पदाधिकारी, नगरसेवक - नगरसेविका, सन्माननीय महाराज, भदंत टेकडीचे भदंत शाशन क्रांति महाथेरो, मुस्लिम समाजाचे मोलवी यांच्यासह इतर मान्यवरांसह नगर परिषदेचे कर्मचारी, कार्यकर्ते व महिला मंडळी उपस्थित होते.

आज दि.८ जानेवारी रोजी सकाळी साडे अकराच्या सुमारास लोकनियुक्त नगराध्यक्ष सौ. रोहिणी भास्कर वानखेडे यांनी पदयात्रेद्वारे वाजत गाजत नगरपरिषद हदगाव येथे जाऊन पदभार स्वीकारला. याप्रसंगी बोलताना नूतन लोकनियुक्त नगराध्यक्ष सौ रोहिणी भास्कर वानखेडे म्हणाल्या की, आज पदभार घेण्याचा आनंद होत असून हा आमच्या वानखेडे कुटुंबांसाठी ऐतिहासिक क्षण आहे. माजी खासदार सुभाषराव वानखेडे व आमदार कोहळीकर यांच्या मार्गदर्शनाखाली आपण दिलेल्या वचन नामाप्रमाणे हदगाव शहराचा चेहरा - मोहरा बदलणार असून रस्ते, नाली, पाणी, वीज यासह स्वास्थ विषयी उद्भवणारे गंभीर प्रश्नांकडे समस्यांकडे आपले विशेष लक्ष राहणार असून प्रत्येक वार्डात अंगणवाडी, तरुणांसाठी अभ्यासिका केंद्र, वाचनालया कडे पण विशेष लक्ष राहणार आहेत. विरोधक हा निवडणुकीपुरता होता यापुढे विरोधकांनी विकास कामांसाठी आवश्यक सहकार्य करावे अशी देखील त्यांनी नम्र आवाहन विरोधकांना यावेळेस मंचावरून केले. यावेळी हेमंत पाटील, माजी खासदार सुभाषराव वानखेडे यांच्यासह इतर मान्यवरांची भाषणे झाली. आ.कोहळीकर यांनी भाषणात विकास कामांची यादीच वाचून दाखवली ज्या कामांना मंजुरी मिळाली त्याची लवकरच सुरुवात होणार असून भविष्यात करण्यात येणाऱ्या विकास कामांची देखील यावेळेस जाहीर पदग्रहण सोहळ्या निमित्त सभेत सांगितले की, नगरपरिषद निवडणूक च्या वेळेस जो आमचा वचननामा होता त्याप्रमाणेच आम्ही शहरातील प्रत्येक वार्डात विकास काम करणार आहोत असे देखील त्यांनी ग्वाही या वेळेस दिली.

# जिल्हा प्रशासनाचा अनोखा उपक्रम 'ई-टपालवाला सेवा'

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ८ जानेवारी-**

राज्याचे मुख्यमंत्री यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या १५० दिवस ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्हा प्रशासनाने नागरिकाभिमुख व अभिनव असा 'ई-टपालवाला सेवा' उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाअंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नागरिकांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती थेट त्यांच्या व्हॉट्सॲपवर पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली.

या सेवेमुळे नागरिकांना कार्यवाही बाबतची माहिती मिळविण्यासाठी कार्यालयात वारंवार येण्याची गरज राहणार नाही. नागरिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अर्ज अथवा पत्र सादर करताना त्यामध्ये स्वतःचा व्हॉट्सॲप क्रमांक नमूद करावा.यामुळे अर्जदारास त्यांनी मागितलेली माहिती घरबसल्या त्यांच्या मोबाईलवर उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात प्रथमच नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयात हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत असून, केवळ मागील दोन दिवसांत १ हजार ५०० नागरिकांना या ई-टपालवाला सेवेद्वारे माहिती देण्यात आली आहे. तसेच आगामी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या गट-क परीक्षेसाठी नेमणूक करण्यात आलेल्या ५७७ अधिकारी-कर्मचाऱ्यांना त्यांचे आदेश या ई-टपालवाला सेवेद्वारे थेट त्यांच्या व्हॉट्सॲपवर पाठविण्यात आले आहेत.

लोकाभिमुख, पारदर्शक, जलद व कार्यक्षम प्रशासन देण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असून, अधिकाधिक नागरिकांनी या सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

## पुसद रोड टी-पॉइंट व महावितरण टी-पॉइंट याठिकाणी बसला गतीरोधक !

**माहूर, दि. ८ जानेवारी-** माहूर शहरातील पुसद रोड टी-पॉइंट व महावितरण टी-पॉइंट येथे गतिरोधक बसविण्याची मागणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस कमिटीचे माहूर तालुका अध्यक्ष आनंद गंगाधरराव



पाटील तुपदाळे यांनी कार्यकारी अभियंता,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालय, नांदेड यांचेकडे दि. ०७ जानेवारी रोजी निवेदनाद्वारे केली आहे. काँग्रेसचे माहूर तालुका अध्यक्ष आनंद पाटील यांनी कार्यकारी अभियंता,राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालय, नांदेड यांचेकडे दिलेल्या निवेदनात लिहिले आहे कि, माहूर हे तालुका स्थळासह पवित्र तीर्थक्षेत्र असल्याने देशभरातून दररोज हजारोच्या संख्येने भाविक भक्त येथे देवदर्शनासाठी येत असतात. तद्वतच शेकडो वाहनांची माहूर शहरात दररोज ये-जा सुरू असते. अनेक वाहने भरधाव वेगाने ये-जा करताना दिसून येतात, परंतु, या रस्त्यावर गतीरोधक नसल्याने अनेक वेळा लहानमोठे अपघात होत असतात. विशेष म्हणजे या रस्त्यावरून नागरिकांसह विद्यार्थी शाळा, महाविद्यालयात ये-जा करतात.भरधाव जाणाऱ्या वाहनांमुळे गतीरोधक अभावी अपघात घडत असतात. त्यामुळे सदरील ठिकांनी मोठा अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने वाहनाच्या वेगावर मर्यादा ठेवण्याकरिता पुसद रोड टी-पॉइंट व महावितरण टी-पॉइंट या दोन्ही ठिकाणी गतिरोधक टाकण्याची मागणी कॉंग्रेस कमिटी माहूर तालुका अध्यक्ष आनंद पाटील तुपदाळे यांनी कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण कार्यालय, नांदेड यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# कौठा प्रभागात विकास कामास निधी कमी पडू देणार नाही : आ. हेमंत पाटील

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ८ जानेवारी-**

नांदेड मनपा महानगरपालिका प्रभाग क्रमांक १९ मधील उमेदवारांच्या प्रचारात भव्य रॅलीचा शुभारंभ करताना आमदार हेमंत पाटील यांनी जुना कौठा, वसरणी, धुमाळवाडी, सर्जन, सिडको या भागात विकास कामास निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन दिले यावेळी दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांची उपस्थिती होती.

नांदेड महानगरपालिका निवडणुका २०२५ ची रणधुमाळणी चालू असून प्रभाग १९ मध्ये शिवसेनेचे उमेदवार भीमराव नारायण गायकवाड, विश्वनाथ नामदेव जटाळे, सौ. अर्चना राजू गोरे, आरती नंदकुमार वैद्य यांच्या



प्रचारात रॅलीच्या भव्य शुभारंभ शिवसेना उपनेते हेमंत पाटील यांच्या हस्ते सिडको संभाजी चौक येथील हनुमान मंदिर येथून शुभारंभ करण्यात आला यावेळी हेमंत पाटील यांनी आपल्या मनोगत व्यक्त करताना म्हणाली की प्रभाग १९ च्या विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही असे आश्वासन दिले यावेळी दक्षिणचे आमदार आनंदराव पाटील बोंढारकर ,बाळू पाटील मोरे, उद्धव पाटील शिंदे, शिवाजी कदम, राजू गोरे, नंदू वैद्य, संभाजी जाधव, राजू तमन्ना यांच्यासह शिवसेनेचे आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्ते यांची उपस्थिती होती या प्रचारार्थ काढण्यात आलेल्या रॅलीत हजारोंच्या संख्येने महिला व पुरुष मतदार सामील होते.

# नांदेडला आधुनिक शहर बनविण्यासाठी आशोक चव्हाणांचे हात बळकट करा : बालाजी बच्चेवार

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव, दि. ८ जानेवारी-**

नांदेड शहराला विकसित, स्वच्छ, सुरक्षित व वाहतूक कोंडीमुक्त बनविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी अनुभवी, दूरदृष्टी असलेले आणि प्रशासकीय क्षमता सिद्ध झालेले नेतृत्व आवश्यक असून, हे नेतृत्व खासदार तथा माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्याशिवाय शक्य नाही, असे ठाम मत भारतीय जनता पक्षाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य व माजी जिल्हा परिषद सदस्य बालाजी बच्चेवार यांनी व्यक्त केले.



नांदेड महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहराचा पुढील पाच वर्षांचा विकास आराखडा ठरणार असून, या निर्णायक क्षणी मतदारांनी केवळ घोषणा नव्हे तर प्रत्यक्ष कामाचा अनुभव असलेल्या नेतृत्वावर विश्वास ठेवावा, असे आवाहन त्यांनी केले. अशोकराव चव्हाण यांचे प्रशासनातील योगदान, विकासाभिमुख निर्णय आणि नांदेडसाठी असलेली ठोस दृष्टी पाहता तेच शहराच्या उज्वल भवितव्याचे शिल्पकार ठरू शकतात, असे बच्चेवार म्हणाले.

नालेसफाई, दर्जेदार रस्ते, भूमिगत गटारी, उड्डाणपूल, नियोजित वाहतूक व्यवस्था, तसेच आधुनिक नागरी सुविधा उभारण्यासाठी आवश्यक असलेली नियोजनशक्ती व अनुभव अशोकराव चव्हाण यांच्याकडे आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली नांदेड शहराचा विकास केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात उतरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. इतर पक्षांकडे ना सक्षम नेतृत्व आहे, ना नांदेडच्या विकासासाठी ठोस आराखडा. केवळ टीका आणि दिशाहीन राजकारणामुळे शहराचा विकास होऊ शकत नाही, याची जाणीव नांदेडकरांनी ठेवावी, असे सांगत बच्चेवार यांनी सुज्ञ मतदारांनी योग्य निर्णय घ्यावा, असे आवाहन केले.

शहरातील आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था, रस्ते, रेल्वे व हवाई संपर्क यांसारख्या मूलभूत गरजांसाठी सक्षम आणि विकासाभिमुख नेतृत्वाची गरज आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश प्रगती करत असताना आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर असताना, सुशिक्षित, विश्वासार्ह आणि विकासाला प्राधान्य देणारे राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या नेतृत्वातच शक्य असल्याचे असे मत बालाजी बच्चेवार यांनी यावेळी व्यक्त केले त्यांनी नमूद केले.

## बुद्ध किर्ती चॅरिटेबल ट्रस्ट चे भीम योद्धा पुरस्कार : प्रस्ताव सादर करावेत

**नांदेड** -बुद्ध किर्ती चॅरिटेबल ट्रस्ट सहयोग नगर नांदेड च्या वतीने २०२६ चा भीम योद्धा पुरस्कार साठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दरवर्षी बुद्ध किर्ती चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे भीम योद्धा हे पुरस्कार दिले जातात. यावेधी हा वितरण सोहळा ३१ जानेवारी २०२६ रोजी करण्यात येणार असून या कार्यक्रमामध्ये भारतीय बौद्ध महासभा समता सैनिक दलाचे सैनिक, महार बटालियन मधील सेवानिवृत्त सैनिक आणि पोलीस दलातील सेवानिवृत्त कर्मचारी ज्यांनी राष्ट्रीयकार्य,धम्मकार्य आणि समाजकार्या मध्ये भरीव योगदान दिलेली आहे अशा कर्तबगार मान्यवरचा भीम योद्धा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. कर्तबगार मान्यवरांचे पुरस्कारासाठीचे प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. त्यासाठी निवड समिती नियुक्ती करण्यात आली आहे.

# महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटना निवडणूक

**तभा वृत्तसेवा**
**भोकर, दि. ८ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्य तांत्रिक ग्रामपंचायत अधिकारी संघटनेची सुधारित दुरुस्ती घटना २०२५ नुसार राज्य कार्यकारिणी निवडणूक २०२६ प्रक्रिया ०४जानेवारी रोजी हॉटेल निसर्ग सुरवडी (फलटण) जिल्हा सातारा येथे सकाळी ९:००ते दुपारी २:०० या वेळेत पार पडली यामध्ये राज्याध्यक्ष पदी नितीन धामणे (छ.संभाजीनगर)यांना ५२मते मिळाली तर विरोधी उमेदवार सचिन शिंदे (सोलापूर) यांना ३मते मिळाली तर राज्यसचिव पदी - हरिश्चंद्र काळे(अहिल्यानगर) यांना दुसऱ्यांदा बिनविरोध संधी मिळाली.

राज्य कार्याध्यक्ष पदी मधुकर मुंगल (नांदेड) यांना ५२ मते मिळाली तर विरोधी उमेदवार कुशाबा इंगळे (सोलापूर) यांना ३ मते मिळाली. राज्य कोषाध्यक्ष पदी महेंद्र निकम (छ.संभाजीनगर) बिनविरोध राज्य उपाध्यक्ष पदी योगेश पगार (नाशिक) अतुल राठोड (यवतमाळ) बिनविरोध राज्य उपाध्यक्ष पदी (महिला) स्नेहल नरळे पाटील (सातारा) आरती पाटील (नंदुरबार) दीपा बेलखडे (वाशिम) बिनविरोध राज्य सहसचिव पदी अशोक पवार (सातारा) बिनविरोध राज्य सह कार्याध्यक्ष पदी लिंबाजी लांडगे (वाशिम)गुलाब सावंत(सातारा) बिनविरोध राज्य सह कोषाध्यक्ष पदी बाजीराव डांगे(नाशिक)राज्य कायदेशीर सल्लागार पदी अशोक कडनर (अहिल्यानगर)अनुप श्रीवास्तव (नांदेड) बिनविरोध राज्य प्रसिद्धीप्रमुख पदी आशिष चौधरी (नांदेड) बिनविरोध राज्य समन्वयक तथा कौन्सिलर पदी गणेश टाकळकर(छ. संभाजीनगर)मार्तंड घाटे (यवतमाळ)अनिल न्हायदे (नाशिक) राज्य संपर्क प्रमुख हेमंत पवार (नाशिक) बिनविरोध निवड मतदार पदाधिकारी व सक्रिय सभासदांमधून राज्य मुख्य निवडणूक कार्यक्रम अधिकारी उद्धव सुपेकर (सातारा) यांनी घोषित केली तर साहेबराव गावडे (सातारा) मनीष पाटील (सातारा) यांनी सहायक निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले निवडणूक कार्यक्रमानंतर फलटण कोरेगाव मतदार संघाचे आमदार सचिन पाटील यांनी हॉटेल निसर्ग येथे येऊन नवनिर्वाचित पदाधिकारी यांचा सत्कार करून संघटनेच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या यावेळी जिल्हाध्यक्ष धनंजय सस्ते, सुनील राजपूत सुरेश चौधरी, गुलाब वडजे, लिंबाजी लांडगे, योगेश कापकर ,जिल्हा सचिव प्रवीण पवार, शशिकांत नरोडे, माया मोढे प्रदीप कुंवर, संजय देशमुख ,अनिल सूर्य पुणे विभागीय अध्यक्ष विजय हुंबे तसेच राज्य भरातील पदाधिकारी, मतदार ,प्रतिनिधी व सक्रिय सभासद बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर निवडणूक प्रक्रिया लोकशाही पद्धतीने, अत्यंत पारदर्शक घटनात्मक तरतुदीला धरून निष्पक्षपणे व शांततामय वातावरणात पार पडली अशी भावना राज्यातील उपस्थित सभासदांनी व्यक्त केली राज्य कार्यकारिणी निवडणूक प्रक्रिया २०२६ नियोजन व व्यवस्था सातारा जिल्हाध्यक्ष धनंजय सस्ते, जिल्हा सचिव प्रवीण पवार व सातारा जिल्हा कार्यकारिणी पदाधिकारी यांनी अत्यंत नीटनेटके सुंदर केले निवडणूक प्रक्रिया पडल्यानंतर नवीन राज्य कार्यकारिणी - २०२६ पहिली बैठक व सभासद समन्वय सभा त्याच ठिकाणी घेण्यात आली बैठकीत राज्यातील कार्यरत १८४०० ग्रामपंचायत अधिकारी संवर्गाचे मंत्रालय पातळीवरील प्रलंबित असणाऱ्या विविध प्रश्नावर चर्चा करण्यात आली व पाठपुरावा करण्याबाबत ठरले यावेळी जिल्हा परिषद निहाय सभासदांना भेडसावत असणाऱ्या अडीअडचणी व प्रश्नावर सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी काळात जिल्हा निहाय दौऱ्याची आखणी करून जिल्हा परिषद निहाय भेट देऊन प्रश्न सोडविण्यात येतील याबाबत राज्याध्यक्ष नितीन धामणे व राज्य सचिव हरिश्चंद्र काळे यांनी सांगितले संवर्ग हितासाठी व माहितीसाठी राज्य कार्यकारिणीच्या परवानगीने प्रसिद्ध करण्यात असल्याची माहिती माहिती राज्य प्रसिद्धी प्रमुख आशिष चौधरी यांनी यावेळी दिली.